अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ३ रा | किंमत : ५ रुपये | पाने ८

विविध कारणावरून दोन ठिकाणी विष प्राशन

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर -जिल्हा परिसरात दोन विविध ठिकाणी दोघा तरुणांनी आज शनिवारी शेतात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.

त्यापैकी पहिली घटना कुसुर (ता. दक्षिण सोलापूर) येथे शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. नाना शिवानंद हब्बे (वय २१) असे विष प्राशन केलेल्या तरुणाचे नाव आहे. आज दुपारी त्याने अज्ञात

कारणावरून शेतात विष प्राशन केले होते. त्याला माळप्पा (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

तर दुसरी घटना बोरीउमरगे (ता. अक्कलकोट) येथे आज सकाळच्या सुमाराज घडली. आकाश शरणप्पा बिराजदार असे त्या तरुणाचे नाव आहे. त्याने सकाळी १० वाजेच्या सुमारास शेतात अज्ञात कारणावरून विष प्राशन केले होते. त्याला भीमाशंकर (भाऊ) यांनी अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल केले. या दोन्ही घटनांची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

ठाकरेंचा 'घाव' वर्मी बसला सभापतींचा 'तंबू' हादरला

फॉरेन वारी कॅन्सल झाली; उद्धवसेनेला 'जडीबुट्टी' मिळाली

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

सत्ताधारी मंडळी सत्तेत मश्गूल असतात. हलवून उठवले तरी त्यांना जाग येत नाही. सर्वसामान्यांची ही ओरड स्वातंत्र्यापासूनची आहे.एकमात्र,कायद्याचा बडगा आला की सत्ताधारी लोकांची धुंदी उतरायला लागते.त्याचा प्रत्यय महाराष्ट्राच्या जनतेला आला आहे.१६ अपात्र आमदारांच्या प्रकरणात दिरंगाई न करण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयाने सभापती राहुल नार्वेकर यांना दिली होती.आपण सभाती आहात.हे न्यायिक पद आहे.घटनेने आपल्याला अधिकार दिले आहेत तेव्हा आपल्या अधिकारात आम्ही हस्तक्षेप करू इच्छित नाही,अशा सहज आणि सोप्या शब्दात सरन्यायाधीश धजंयज चंद्रचूड यांनी सभापतींना कानपिचक्याही दिल्या होत्या.मात्र,सभापतींची यात चालढकल दिसून येताच उद्धव ठाकरे गटाकडून कायद्याचे नवे अस्त्र उगारले गेले.भात्यातील बाण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह नार्वेकर यांच्या वर्मी बसला.त्यामुळे सत्ताधाऱ्यांचा तंबू हादरला. ठाकरे गटाच्या प्रतिज्ञापत्रामुळे पुन्हा कायद्याचे फटकारे नको म्हणून शिंदे –नार्वे कर यांना आपला विदेश दौरा रद्द करावा लागला.या पोलिटिकल टर्निंग पाईंटमुळे ठाकरे गटाला जडीबुट्टी मिळाली आहे.

१६ आमदार अपात्र प्रकरणाच्या सुनावणीवरून शिंदे-ठाकरे या दोन गटात जोरदार संघर्ष सुरू आहे.न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रकरणाची सुनावणी तातडीने घ्यावी,अशी मागणी ठाकरे गटाकडून लावून धरण्यात आली आहे पण नार्वेकरांची एकंदरीत भूमिका पाहाता वेळकाढूपणाची स्पष्टपणे दिसत आहे. नार्वेकर यांनीही कायद्याच्या बाबींवर बोट ठेवत विलंब करणार नाही आणि घाई देखील करणार नाही,असे विधान करून ठाकरे गटाचा गॅसवर ठेवण्याचा प्रयत्न चालवलेला होता.याप्रकरणाची सुनावणी १३ ऑक्टोबरला ठेवण्यात आली आहे.

दरम्यान ३० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत आफ्रिकेतील घाना येथे आयोजित राष्ट्रकुल संसदीय परिषदेला नार्वे कर हे उपस्थित राहणार होते. शुक्रवारीच त्यांचे निर्गमन होणार होते परंतु ठाकरे गटाने वेळीच चलाखी दाखवली. नार्वेकर यांनी सुनावणीसाठी जे वेळापत्रक तयार केले आहे,त्याला हरकत घेणारे प्रतिज्ञापत्र शुक्रवारी सकाळीच ठाकरे गटाने न्यायालयात दाखल केले. आमदार अपात्रतेची सुनावणी प्रलंबित असताना नार्वे कर घानाला जाणार असल्याने विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. न्यायालयाकडून कधीही बोलावणे आले असते. त्याचा विचार करून नार्वेकर यांनी हा दौरा रद्द केल्याची चर्चा आहे.

ठाकरे गटाचा संशय

नार्वेकर हे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली घानासाठी नियुक्त मूळ शिष्टमंडळाचा भाग नसून अपात्रतेच्या सुनावणीला उशीर करण्यासाठी त्यांना पाठवण्यात येत असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला होता.महाराष्ट्रातील लोकशाही संविधान घाण्याला जुंपून वऱ्हाड निघालेय 'घाना'ला अशी टीका त्यांनी केली होती.आमदार अपात्रतेच्या सुनावणीला उशीरा करणारे नार्वेकर हे संसदीय लोकशाहीच्या बैठकीसाठी जात आहेत, हे विडंबन आहे की विनोद? असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला होता. आमदार अपात्रता प्रकरणी जानेवारी २०२४ च्या मध्यापर्यंत साप्ताहिक सुनावणी सुरु राहणे अपेक्षित असल्याचे एक वेळापत्रक नार्वेकर यांनी तयार केले आहे,असा ठाकरे गटाचा संशय आहे.

चौकट– अधिकाऱ्यांचा अजब दावा

याप्रकरणी विधिमंडळ अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. नार्वेकर यांनी या आठवड्याच्या सुरुवातीलाच आपला दौरा रद्द केला होता. म्हणजेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्यांनी नार्वेकरांच्या घाना दौऱ्याबद्दल टीका करण्याआधीच त्यांनी कार्यक्रमात बदल केले होते. घाना दौरा रद्द केल्याचे या आठवड्याच्या सुरुवातीलाच अधिकृतपणे कळविण्यात आले होते. आमदार अपात्रता प्रकरणी पुढील सुनावणीची तारीख १३ ऑक्टोबर असल्याने या कारवाईशी त्याचा काहीही संबंध नाही. नार्वेकरांच्या दौऱ्यामुळे सुनावणीला विलंब झाला नसता असे विधिमंडळाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.दौरा रद्द झाल्याची न्यूज यापूर्वीच द्यायला हवी होती पण प्रतिज्ञापत्र दाखल होताच शुक्रवारी रात्री उशीरा दौरा रद्द झाल्याची माहिती प्रसिद्ध करण्यात आली.

तू...तू,मैं...मैं...

मुख्यमंत्री शिंदे यांचा लंडन व बर्लिन दौरा रद्द झाल्यानंतर शिंदे व ठाकरे गटात सवाल–जबाब सुरू झाला आहे.राज्यात दुष्काळी स्थिती आणि काही ठिकाणी अतिवृष्टीची स्थिती असताना शिंदेंनी दौऱ्यावर जाणे उचित आहे काय? करदात्यांच्या पैशावर उधळपट्टी कशासाठी?दौऱ्यावर जायला काहीच हरकत नाही पण त्याची फलनिष्पत्ती काय? हे कोण सांगणार? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी विचारला होता.त्यानंतर दौरा रद्द झाला.शिंदे हे आदित्य यांना घाबरतात,अशी विधाने ठाकरे गटाच्या नेत्यांकडून होतायेत.त्याला सत्ताधारी पक्षाकडून जशास तसे उत्तर दिले गेले. शिंदे यांनी दुष्काळी स्थिती पाहूनच हा दौरा रद्द केल्याचे भाजप नेते नितेश राणे यांनी म्हटले आहे.मंत्री उदय सामंत यांनी तीन दिवसांपूर्वीच हा दौरा रद्द झाला आहे.अपात्र प्रकरणाशी त्याचा काहीच संबंध नाही,असे सांगितले.

सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. प्रकाश महानवर यांची नियुक्ती

✔ सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. प्रकाश महानवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल तथा राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांनी डॉ. प्रकाश महानवर यांची नियुक्ती केली. डॉ. प्रकाश महानवर (जन्म:०१.०६.१९६७) सध्या मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेत वरिष्ठ प्राध्यापक व संचालक पदावर कार्यरत आहेत

डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा कार्यकाळ ५ मे २०२३ रोजी संपल्यामुळे सदर पद रिक्त झाले होते. त्यानंतर डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांच्याकडे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदाच्या नियुक्तीसाठी राज्यपालांनी आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांदे यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरु निवड समिती गठीत केली होती. विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेचे संचालक प्रमोद पडोळे, हैद्राबाद येथील इंग्रजी व परकीय भाषा विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. ई. सुरेशकुमार (युजीसी प्रतिनिधी) व राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी हे समितीचे सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी यांनी डॉ. प्रकाश महानवर यांची कुलगुरुपदी नियुक्ती जाहीर केली आहे.

केडगाव येथे झाडाला टांगून मारहाण; महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

कोर्टातील केस काढून घे, नाहीतर तुला खोट्या गुन्ह्यात अडकावतो अशी धमकी देऊन एका ४५ वर्षीय इसमाला पळवून नेऊन त्याला झाडाला टांगून बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना केडगाव (ता. करमाळा) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. रेण्या पवन्या काळे (वय ४५ रा.केडगाव) असे जखमी झालेल्या इसमाचे नाव आहे. आरोपींच्या तावडीतून सुटका झाल्यानंतर त्यांने करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी सुधाबाई पंढऱ्या काळे, तिचा पती पंढऱ्या काळे, शिरक्या काळे (सर्व रा.केडगाव) आणि अश्या पवार (रा.जामखेड जि.नगर) अशा चौघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

रेण्या काळे हा दुपारी दोन वाजेच्या सुमारास केडगाव येथील स्टँडवर थांबला होता. त्यावेळी वरील चौघांनी त्याला गाठून कोर्टातील केस काढून घे, असे म्हणत त्याला बळजबरीने परफटत आपल्या वस्तीवर नेले. आणि त्याला झाडाला दोरीने टांगून काठी आणि लोखंडी रॉडने मारहाण करीत खिशातील २हजार ५०० रुपये काढून घेतले. अशी नोंद करमाळा पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक कुंजीर पूढील तपास करीत आहेत.

पळून गेलेल्या तिघी नाशिकमधून ताब्यात

२४ तासात पोलिसांनी केला तपास

✔ सुराज्य/सोलापूर

घरातून फूस लावून पळवून नेलेल्या तिन्ही मुलींना शहर पोलिसांनी २४ तासाच्या आता नाशिकमधून ताब्यात घेतले. त्यांच्याकडील साडेसात लाखांची रोकड आणि तीन लाखांचे दागिने जप्त केले. मुलींसह मुद्देमाल नातलगांकडे सुपूर्द करण्यात आला.

शहरापासून जवळच असलेल्या एका गावात किराणा दुकान चालवून एकत्र कुटुंब वास्तव्यास होते. २७ सप्टेंबर रोजी यातील तक्रारदार महिलेची एक १८ वर्षाची सज्ञान, दुसरी १३ वर्षाची आणि दिराची १३ वर्षाची मुलगी अशा तिघी मुली २७ सप्टेंबर रोजी घरातून पळून गेल्या होत्या. जाताना त्यांनी लाखोंची रोकड आणि दागिने नेली होती. यानंतर तातडीने मुलींची आईने सलगर वस्ती ठाण्यात तिघींना फूस लावून तिघींना पळवून नेल्याची तक्रार दिली होती. तपास करताना सलगरवस्ती पोलिसांना त्या नाशिक येथे असल्याचे समजले. पोलिसांनी नाशिक युनिट २ येथील पोलीस अंमलदाराची मदत घेऊन त्यांना ताब्यात घेतले. अंबड पोलीस ठाण्यात नेऊन रोख रक्कम व दागिन्याबद्दल चौकशी केली. त्यांच्याकडून ७ लाख ५० हजार रोख रक्कम आणि अंदाजे तीन लाखांचे दागिने जप्त केले. पथकाने सोलापुरात आल्यानंतर मुलींसह वरील ऐवज त्यांच्या ताब्यात देण्यात आला. ही कारवाई फौजदार सचिन मंद्रूपकर, हवालदार बालाजी पोतदार, अय्याज बागलकोटे, अविनाश डिगोळे, बाबुराव क्षीरसागर, मैना घुमरे यांनी यशस्वी केली.

कारखान्यातील बॉयलर फुटला; उकळते पाणी अंगावर पडून मजूर ठार

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील घटना

✔ सुराज्य/सोलापूर

कारखान्यातील सुताला रंगकाम करताना अचानक बॉयलर फुटून उकळते पाणी अंगावर पडल्याने ३६ वर्षीय मजूर भाजून मरण पावला. ही घटना अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील मर्दा फॅब्र डाईंग कारखान्यात शनिवारी सकाळच्या सुमारास घडली.

दयानंद श्रीमंत चेंडके (वय ३६ रा. बोरामणी ता.दक्षिण सोलापूर) असे मयत झालेल्या कामगाराचे नाव आहे. ते आज सकाळी मर्दा डाईंग या कारखान्यात डाईंगचे काम करीत होते. त्यावेळी अचानक बॉयलर फुटला. आणि उकळते पाणी अंगावर पडल्याने ते भाजून गंभीर जखमी झाले होते. त्यांना हेमंत गुळवे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारा दरम्यान दुपारी मयत झाले. मयत दयानंद चेंडके यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून फौजदार रजपुत पूढील तपास करीत आहेत.

महिलेचा हात पिरगाळून विनयभंग

✔ सुराज्य/सोलापूर

तु बहुत अच्छी दिखती है असे म्हणून पीडित महिलेचा हात पिरगाळुन मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून विनयभंग केल्याप्रकरणी एकाविरुध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २८ सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास सोलापुरात येथे घडली.याप्रकरणी पीडित महिलेने सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून रोहन विजयसिंह कल्लावाले (रा.सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पीडित महिला ही परी जात असताना त्यांच्या भावास मारहाण करत असल्याचे समजल्यानंतर रोहन कल्लावाले याला तू मेरे भाई को क्यू मारा है, मेरा भाई कहा है असे विचारले असता,कल्लावाले याने तुम्हारा भाई मेरा मार खाके चला गया अब तु आई है क्या, असे म्हणून महिलेच्या जवळ जाऊन हात पिरगाळत मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलकर्णी हे करीत आहेत.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

आज कोणीतरी दोन हजाराची नोट दिली !

कल्याण
148-39-450

मनोज जरांगे पाटील गुरुवारपासून दोन दिवस सोलापुरात

शहर- जिल्ह्यात ५ सभा घेणार

✔ सुराज्य/सोलापूर

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे आणि सरसकट मराठ्यांना कुणबी दाखले मिळावेत या मागणीसाठी उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील यांची गुरुवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी सोलापुरात येत आहेत. यादिवशी ते शहर आणि जिल्ह्यात पाच सभा घेणार आहेत. दुपारी २ वाजता सोलापुरात हुतात्मा स्मृती मंदिर येथे सभा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती सकल मराठा समाज सोलापूर जिल्ह्याच्या वतीने माऊली पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अंतरवली सराटी येथे जरांगे पाटील यांनी लोकशाही मार्गाने आंदोलन केले. परंतु या दरम्यान पोलिसांनी बळाचा वापर केला. तरीही आपल्या भूमिकेपासून ते तसुबरही ते ढळले नाहीत. मराठा समाजाला आरक्षण हे कार्यालय ल मिळावे म्हणून त्यांनी आपले उपोषण सुरूच ठेवले होते. सरकारवर दबाव राहावा आणि सरकारला मराठा समाजाची ताकद दिसावी म्हणून अंतरवली सराटी येथे शंभर एकर जागेवर भव्य आरक्षण परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला लाखोच्या संख्येने मराठा बांधवांनी उपस्थित राहावे यासाठी जरांगे पाटील हे महाराष्ट्रभर दौरा करत प्रत्येक जिल्ह्यात आवाहन करणार आहेत.

दरम्यान, दि. ५ आणि ६ ऑक्टोबर २०२३ रोजी ते सोलापूर दौऱ्यावर आहेत. त्या अनुषंगाने ते सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर शहरासह, मंगळवेढा, पंढरपूर , कुर्डूवाडी, बार्शी या तालुक्याच्या ठिकाणीही जाहीर सभा घेणार आहेत. गुरुवारी दि. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे त्यांची सभा होणार आहे, असे माऊली पवार यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस प्रा. गणेश देशमुख, राजन जाधव, सूर्यकांत पाटील, श्रीकांत डांगे, जी. के. देशमुख, प्रकाश ननवरे, सचिन तिक आदी उपस्थित होते.

कुणबी दाखले आणण्याचे आवाहन

गुरुवारी सोलापुरात होणाऱ्या सभेला मोठ्यासंख्येने मराठा बांधवांनी उपस्थित राहावे आणि ज्या मराठा बांधवांकडे कुणबी असल्याचा पुरावा असेल त्यांनी सोबत घेऊन सभेला यावे, असे आवाहन सकल मराठा समाज सोलापूर शहर – जिल्हाच्या वतीने माऊली पवार यांनी यावेळी केले.

शेतात आग लावल्याने लाखाचा ऊस जळाला

✔ सुराज्य/सोलापूर

अनोळखी इसमाने शेतात आग लावल्याने दीड एकर जळून १ लाखाचे नुकसान झाले . ही घटना माळखांबी (ता. माळशिरस) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. यासंदर्भात आप्पासाहेब संभाजी शेळके (वय ६० रा.माळखांबी) या शेतकऱ्याने अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली . त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे . शेळके यांच्या गट क्रमांक ३४२ येथील शेतात काल दुपारी ४ वाजेच्या सुमारास अनोळखी इसमाने आग लावली होती . त्यात दीड एकर ऊस जळून १ लाख रुपयाचे नुकसान झाले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार पानसरे करीत आहेत.

पाकिस्तान हा भारतापेक्षा कमकुवत संघ : वकार

सुराज्य/मुंबई

१४ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांवर दबाव असेल, पाकिस्तान हा भारतापेक्षा कमकुवत संघ आहे आणि त्यामुळे त्याच्यावर दबाव येईल. युनूसने सांगितले की, आम्हाला माहीत आहे की भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना सर्वात मोठा असेल, असा विश्वास अनुभवी वेगवान गोलंदाज वकार युनूसने व्यक्त केला आहे.

भारतीय संघ सलग आठव्यांदा पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय विश्वचषक मालिकेतील सामना जिंकण्याचा प्रयत्न करणार असताना दुसरीकडे, पाकिस्तानची नजर भारताविरुद्धच्या वन डे विश्वचषकातील पहिल्या विजयाकडे असेल. नुकत्याच पार पडलेल्या आशिया चषक स्पर्धेत भारताचा पाकिस्तानशी दोनदा सामना झाला होता, ज्यातील एक सामना पावसामुळे रद्द झाला होता, तर दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाने पाकिस्तानवर १२८ धावांनी दणदणीत विजय नोंदवला होता.

वकार युनूसने विश्वचषक स्पर्धेपूर्वी स्वतःच्याच संघाला कमकुवत म्हटल्याने सोशल मीडियात एकच चर्चा सुरु झाली आहे. वकार म्हणाला की, 'पाकिस्तान हा भारतापेक्षा कमकुवत संघ आहे आणि त्यामुळे त्याच्यावर दबाव येईल. युनूसने सांगितले की, 'आम्हाला माहीत आहे की भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना सर्वात मोठा असेल. जेव्हा तुम्ही अहमदाबादमध्ये खेळता तेव्हा तुम्हाला तुमच्या मज्जातंतूंवर (नर्व्ज) नियंत्रण ठेवावे लागते, तुम्ही जर गोंधळून गेलात तर मग टीम इंडिया तुमच्यावर भारी पडेल. एवढेच नाही तर पाकिस्तान भारतापेक्षा कमकुवत संघ असल्यामुळे त्यांच्यावर दबाव हा जास्त असेल. तसेच, भारतावरही दडपण असेल कारण मैदानात उपस्थित प्रेक्षकांची गर्दी दोन्ही संघांवर दबाव टाकेल. अलीकडच्या कामगिरीच्या आधारे भारत हा चांगला संघ असल्याचे युनूसने मान्य केले. टीम इंडियाने नुकताच आशिया चषक जिंकला आणि विश्वचषकापूर्वी एकदिवसीय मालिकेत ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. तो म्हणाला, जर आपण केवळ सांघिक कामगिरीच्या आधारे मूल्यांकन केले तर भारत निश्चितपणे एक चांगला संघ आहे. टीम इंडियाच्या तुलनेत आम्ही या विश्वचषकात कमकुवत आहोत.

पाकिस्तान संघाबाबत वकार युनूस म्हणाला की, 'नसीम शाहची अनुपस्थिती हा विश्वचषक पाहता पाकिस्तानी संघासाठी मोठा धक्का आहे. मला जर पाकिस्तानच्या विश्वचषक जिंकण्याच्या शक्यतेबाबत विचारल्यास ते तर ते अंडर डॉग आहेत. नसीम शाहच्या अनुपस्थिती संघाला जाणवणार असून त्याचा खूप मोठा फटका पाकिस्तानला बसणार आहे. कारण, नसीम आणि शाहीन आफ्रिदी नवीन चेंडूने एकमेकांना पूरक आहेत. अशावेळी बाबरची कॅप्टन्सी कस लागणार हे निश्चित.'

भारत विरुद्ध इंग्लंड सराव सामना पावसामुळे रद्द

सुराज्य/गुवाहाटी



विश्वचषक स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. त्याआधी सर्व संघ सराव सामन्यात सहभागी होत आहेत. गुवाहाटी येथे शनिवारी (३० सप्टेंबर) भारत आणि इंग्लंड यांच्यातील सराव सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यानंतर हवामान खराब झाल्याने खेळ सुरू होऊ शकला नाही. सततच्या पावसामुळे अंपायर्सनी बराच वेळ प्रतीक्षा केल्यानंतर सामना रद्द झाल्याचे घोषित केले. भारत आणि इंग्लंडच्या संघांना विश्वचषकापूर्वी सरावाची संधी मिळाली नाही. दोघांमधील पहिला सराव सामना गुवाहाटी येथे होणार होता, मात्र पावसामुळे तो होऊ शकला नाही. गुवाहाटी येथील स्टेडियममध्ये मोठ्या संख्येने प्रेक्षक पोहोचले होते, मात्र, त्यांना निराश होऊन परतावे लागले. या मैदानावर २९ सप्टेंबर रोजी बांगलादेश आणि श्रीलंका यांच्यातील सराव सामना पूर्ण झाला. त्यात बांगलादेशने सात गडी राखून विजय मिळवला होता. भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यानंतर हवामान खराब झाल्याने खेळ सुरू होऊ शकला नाही. सततच्या पावसामुळे अंपायर्सनी बराच वेळ प्रतीक्षा केल्यानंतर सामना रद्द झाल्याचे घोषित केले. टीम इंडिया आता ३ ऑक्टोबरला नेदरलँडविरुद्ध दुसरा सराव सामना खेळणार आहे. हा सामना तिरुअनंतपुरममध्ये होणार आहे.

स्नेहलता नरवणी यांची अन्नछत्र मंडळाला भेट

सुराज्य/अक्कलकोट : राज्य उत्पादन शुल्क मुंबई विभागाचे अधिक्षक स्नेहलता संदीप नरवणी यांनी अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाला भेट दिली. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे धार्मिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य प्रणाली असल्याचे त्या म्हणाल्या. न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ॲड. संतोष खोबरे, सिध्देश्वर मोरे व मंडळाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सिध्दाराम कल्याणी, एस. के. स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब पोळ, दत्ता माने, निखिल पाटील, महांतेश स्वामी, समर्थ यादगे धनंजय निंबाळकर,

डॉ. राजकुमार देशमुख उत्तम अभियंता पुरस्काराने सन्मानित

सुराज्य/सोलापूर

अकलूज येथील डॉ. राजकुमार मोहनराव देशमुख यांना उत्तम अभियंता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शासकीय अधिकारी व कर्मचारी कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक मंच सोलापूर यांच्या वतीने दिला जाणारा भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या उत्तम अभियंता २०२३ पुरस्कार वितरण सोहळा दि. २६ सप्टेंबर रोजी सोलापूर येथे पार पडला. जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, माजी उपमहापौर प्रा. नसीम पठाण व इतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. डॉ. देशमुख हे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर येथे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पदावर कार्यरत असून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

उत्तम अभियंता हा पुरस्कार नेहमीच माझ्या जबाबदारीची जाणीव करून देत राहील, आपल्या कामाचे कौतुक कोणी जाणीवपूर्वक केले तर ते मनाला सुखावून जाते आणि पुढील प्रगतीसाठी स्फूर्ती मिळते, असे मत डॉ. देशमुख यांनी पुरस्कार मिळाल्यानंतर व्यक्त केले. वडील मोहनराव देशमुख, आई संगीता, पत्नी अनुजा यांनी हा पुरस्कार मिळाल्याचा आनंद व्यक्त केला असून सर्व स्तरातून डॉ. देशमुख यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रमाबाईसाहेब रानडे पुरस्कार डॉ. सुहासिनी शहा यांना जाहीर

सोलापूर : पुणे सेवासदन संस्था शाखा सोलापूरतर्फे देण्यात येणारा रमाबाईसाहेब रानडे पुरस्कार यंदा प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांना जाहीर झाला आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री यांनी दिली. पुणे सेवासदन संस्था शाखा सोलापूरतर्फे दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. मंगळवार दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या वा. का. किर्लोस्कर सभागृहात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. तसेच याप्रसंगी सेवासदन शताब्दी महोत्सव स्मरणिकेचेही प्रकाशन होणार आहे. पुणे सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा वर्षा परांजपे यांच्या हस्ते आणि सरचिटणीस चिंतामणी पटवर्धन, कार्यकारणी सदस्या अश्विनी गानू यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. यावेळी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांची प्रकट मुलाखत अश्विनी मोरे-वायमोडे घेणार आहेत. या कार्यक्रमास सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पुणे सेवासदन संस्था सोलापूर शाखेच्या सचिवा वीणा पतकी यांनी केले आहे.

भारत मुक्ती मोर्चाच्यावतीने उद्या महाराष्ट्र बंदची हाक

सोलापूर : भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग (ओबीसी) मोर्चा, छत्रपती क्रांती सेना, सत्यशोधक मूलनिवासी वारकरी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. गृहमंत्री देवेंद फडणवीस यांच्या आदेशानुसार मराठा आंदोलकांवर झालेला लाठीचार्ज व गोळीबाराची चौकशी व्हावी, राज्यातील ६२ हजार सरकारी शाळांचे करण्यात येणारे खासगीकरण रद्द करावे, शिव-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात होत असलेली वेठबिगारी हाणून पाडावी, ओबीसींची जातीनिहाय जनगणना करावी व त्यांना संविधानिक हक्क मिळवून द्यावा, बहुजनाचे प्रेरणास्थान असलेले पंढरपूरचे विठ्ठल मंदिर बडव्याच्या हाती देऊ नये, बहुजन महापुरुषांचा व संविधान तसेच राष्ट्र प्रतिकांचा अपमान करणाऱ्या संभाजी भिडे यांचा कायमचा बंदोबस्त करावा, या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी या बंदही हाक देण्यात आली आहे.

विठ्ठल दयाजी मंडळातर्फे विविध कार्यक्रम

पिलीव : माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील विठ्ठल दयाजी सामाजिक मंडळातर्फे गणेशोत्सवानिमीत्त विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये माणदेशी हेल्थ केअर सेंटरच्यावतीने आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यात ४१ नागरिकांची तपासणी करण्यात आली. रक्तदान शिबिरात ४० सभासदांनी सहभाग नोंदवला. शिबिराचे उद्घाटन पिलीव पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार दत्ता खरात व अमित जाधव यांच्या हस्ते करण्यात आले तर यावेळी मंडळातर्फे वृक्षारोपण करण्यात आले.

२ हजार मेंढरांसह धनगर समाजाचा मंगळवारी जनआक्रोश मोर्चा

सोलापूर : धनगर समाज एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे या मागणीसाठी समस्त धनगर समाजाच्यावतीने मंगळवार दि. ३ ऑक्टोबर रोजी स. ११ वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मोहोळ तहसील कार्यालय येथे २ हजार मेंढरे व १५० ढोल घेऊन जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती बिरुदेव देवकते यांनी पत्रकार परिषदेत दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमध्ये धनगर समाजासाठी दिलेल्या एसटीच्या आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे.

७० वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. तो सोडविण्यासाठी समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे. आदिवासींना यादरून धनगर समाजाचा हक्क डावलणाऱ्या सरकारला जागे करण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. समाजाचे नेते यावेळी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यासह मोहोळ तालुक्यातील धनगर समाजाने सहकुटुंब जनआक्रोश मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. विठोबा पुजारी यांनी केले आहे. यावेळी कृष्णदेव वायमोडे, बाळासाहेब वायमोडे, विलास देरे, रामभाऊ खांडेकर उपस्थित होते.

'बिग बॉस' नंतरची 'दिल दोस्ती दिवानगी'

सोलापूर : 'बिग बॉस' गाजवलेली मंडळी आता 'दिल दोस्ती दिवानगी' करताना दिसणार आहेत. अभिनेते विद्याधर जोशी, अभिनेत्री सुरेखा कुडची, ग्लॅमरस अभिनेत्री वीणा जगताप आणि स्मिता गोंदकर यांचा दिल दोस्ती दिवानगी' हा मराठी चित्रपट ६ ऑक्टॉबरला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. ट्रान्स इंडिया मिडिया अँड एन्टरटेनमेन्टची प्रस्तुती असलेल्या 'दिल दोस्ती दिवानगी' चित्रपटाची निर्मिती राजेंद्र राजन यांची असून शिरीष राणे चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत.

ट्रॅक्टर्सच्या डिलिव्हरीज्ना सोलापूरातून सुरुवात

सोलापूर : भारतातील पहिल्या क्रमांकाचा ट्रॅक्टर ब्रँड, महिंद्रा ट्रॅक्टर्सने महिंद्राचा नवा, वजनाला हलका ट्रॅक्टर-महिंद्रा ओजाच्या डिलिव्हरीजना सोलापूरमधून सुरुवात केली आहे.

गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर डिलिव्हरीजना सुरुवात करण्यात आली असून गणपती विशेष 'महिंद्रा ओजाचीवारी, अष्टविनायकाच्याद्वारी' मध्ये देखील ओजा झळकणार आहे. यामध्ये अभिनेते अजय पुरकर यांच्यासह महाराष्ट्रातील सर्व अष्टविनायकांच्या दर्शन यात्रेचे नेतृत्व ओजा करणार आहेत.

कुर्डूवाडी प्रणिता दोशी ठरल्या मानाच्या पैठणीच्या मानकरी

सुराज्य/कुर्डूवाडी

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून श्री दत्तगणेश प्रतिष्ठान कुर्डूवाडी यांच्यावतीने खास महिलांसाठी स्टार मिनिस्टर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत प्रणिता पद्मकुमार दोशी यांनी प्रथम क्रमांक मिळवत पैठणीच्या मानकरी ठरल्या. माढा तालुक्यातील कुर्डूवाडी येथील श्री दत्तगणेश प्रतिष्ठान यांच्यावतीने गणेश महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अभिनय प्रोडक्शन प्रस्तुत व अभिनेते प्रकाश आतकर निर्मित स्टार मिनिस्टर अर्थात 'खेळ पैठणीचा, सन्मान वहिनींचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या स्पर्धेत यांनी विविध खेळांमध्ये उखाणे, फुगे फुगवणे, तळ्यात मळ्यात, गाणी, टिकली लावणे, सामान्य ज्ञान परीक्षा, लावणी नृत्य आदी अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत पैठणीसाठी प्रणिता पद्मकुमार दोशी प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. अकलूजच्या कलाकार उमेश शिंदे यांनी सादर केलेली लावणीने सर्वजण मंत्रमुग्ध झाले होते. गणेश उत्सवात स्पर्धांसाठी संगीत खुर्ची केशव इंगळे, अक्षय शेटे, माजी नगराध्यक्ष राजेंद्र पारखे, अशपाक पठाण व खुशालभाऊ ज्वेलर्स अकुलगावकर, पाककला स्पर्धा बाळासाहेब गोरे, ॲड. पुरुषोत्तम क्षीरसागर, मोफत आयुष्यमान भारत कार्ड राहुल गोरे, स्टार मिनिस्टर नगराध्यक्ष निवृत्ती गोरे, विजय क्षीरसागर, अभियंता अमरसिंह भोरे, भोसरे सरपंच मनोज बागल यांच्यातर्फे ठेवण्यात आली होती.

केंद्रप्रमुख पदासाठी स्पर्धा परीक्षा आणि पदोन्नतीकरीता टक्केवारीची व वयाची अट रद्द

शिक्षक सहकार संघटनेच्या पाठपुराव्याला यश; शिक्षकांना दिलासा

सुराज्य/सोलापूर

केंद्रप्रमुख पदासाठी स्पर्धा परीक्षा व पदोन्नती करिता टक्केवारी व वयाची अट अखेर रद्द करण्यात आली आ त्याबाबत शिक्षक संघटनेला प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

केंद्रप्रमुख पदाच्या अर्हतेमधील शासन शुध्दीपत्रक दि. ९ मार्च २०२३ अनुसार शासन निर्णय १ डिसेंबर २०२२ मधील सुधारित करण्यात आलेली परिच्छेद क्र. ५.१ येथील मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेकरीता पदवी परीक्षेमध्ये किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक असलेली अट होती. तसेच शासन निर्णय दि. ०१.१२.२०२२ मधील परिच्छेद क्र. ५.२ येथील मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेकरीता विहित करण्यात आलेली किमान ५० वर्ष वयाची अट ठेवण्यात आली होती. या दोन्ही अटी रद्द व्हाव्यात यासाठी शिक्षक सहकार संघटनेने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सचिव रणजितसिंह देओल व उपसचिव तुषार महाजन यांच्या सोबत यशस्वी चर्चा केली होती. त्यांनी अट रद्द करण्याचे आश्वासन संघटनेला दिले होते. त्या बाबतचा शासन निर्णय २७ सप्टेंबरला निर्गमित झाला आहे. मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे निवडीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए./बी.कॉम/बी. एस्सी. ही पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) किंवा प्रशिक्षित शिक्षक (प्राथमिक) या पदावर किमान ६ वर्ष अखंडीत सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे.

ज्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) या पदावर किमान ६ वर्ष अखंडीत सेवा पूर्ण केली असेल अशा उमेदवारामधून सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पात्र उमेदवारांच्या पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल. हा शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात आला आहे.

विवेकानंद प्रतिष्ठान व्याख्यानमालेचा समारोप

अजितकुमार कोष्टी यांनी श्रोत्यांना केले लोटपोट

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोटमधील रसिकांना गाण्यांच्या इरसाल किस्साने हास्यसम्राट अजितकुमार कोष्टी यांनी मंत्रमुग्ध केले. विवेकानंद प्रतिष्ठानच्यावतीने प्रियदर्शिनी सांस्कृतिक भवन येथे गणेशोत्सव सांस्कृतिक व्याख्यानमालेचे शेवटचे पुष्प गुंफताना 'चला हसू या' या विषयावर ते बोलत होते. संपूर्ण सभागृह हास्यसम्राटांच्या हास्य विनोद व किस्यात न्हावून निघाला.

प्रारंभी श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन बाबासाहेब निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचलन बापूजी निंबाळकर यांनी केले तर आभार खंडेराया यादगे यांनी मानले. व्याख्याता हास्यसम्राट यांचा परिचय विद्याश्री बिराजदार यांनी करुन दिला. यावेळी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष, तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी, मल्लिनाथ कल्याणशेट्टी, शांभवी कल्याणशेट्टी, मनोज कल्याणशेट्टी, प्रा. शंकर धडके, धनंजय गाढवे, राजकुमार झिंगाडे, गुरूपादप्पा आळगी, मल्लिनाथ मसुती, अशोक येणगुरे, विलास कोरे, राजशेखर मसुती, अभिजित लोके, चंद्रकांत दसले, निलकंठ कापसे, संतोष जिरोळे यांच्यासह नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पद्मशाली महिला संघमतर्फे पाक कला स्पर्धा

सुराज्य/सोलापूर

ओमसाई प्रतिष्ठान संयुक्त विद्यमाने पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली महिला संघमच्यावतीने पौष्टिक पाक कला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे गणेश पेनगोंडा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून स्त्री रोगचिकित्सक डॉ. कविता रव्वा उपस्थित होत्या. एकूण ३३ महिलांनी स्पर्धेत सहभाग घेतला. सहभागी महिलांना केलेल्या पदार्थातून यशस्वी ४ क्रमांक व २ उत्तेजनार्थ पारितोषिके काढण्यात आली. त्यात प्रथम क्रमांक कविता जक्का, द्वितीय क्रमांक शारदा पद्मा, तृतीय क्रमांक पवित्रा आणि उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक पद्मावती श्रीमल व उत्तेजनार्थ यशोदा नरोळे, उत्तेजनार्थ ललिता बिटला, सरस्वती दासरी यांना देण्यात आला आहे.

कार्यक्रमास विजया वड्डेपल्ली, संस्थेच्या अध्यक्ष माधवी अंदे, विद्या सिंगम, हेमा गोसकी, प्रभावती मद्दा, वनिता सुरम, रेणुका बुधारम, अंजली इराबत्ती, मेघना गड्डम, रजनी येमूल, लक्ष्मीबाई चित्याल यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमात सकिन्यालू, ग्यारप्पालू, पालक राइस, फ्रूट सलाड, काकडी कोशिंबीर, लसूण भाजी, सरवा पिंडी, आंध्र मिरची भजी, हरभरा डाळ वडे, कोथिंबीर वडी, बटाटा कटलेट, भाकरी, गोंगुरा पच्चडी, समोसा, मसाला भात, वांग्याचे भरीत, उकडीचे मोदक, तळलेले मोदक, खजूर वडी, पुलहोरा राइस, खोबरा वडी, गुलाब जामून, बुंदी लाडू, आलू पराठा, तीळ चिक्की, बीट हलवा केक, कारल्याची भाजी, बेसन बर्फी, गव्हाच्या पिठाचे गुलाबजामून, फ्लॉवर मंच्युरिअन, सोयाबीनची भाजी, केसर बदाम मिल्क शेक, शेवयाची खीर इत्यादी पदार्थ स्पर्धकांनी बनवून आणले होते.

आज भारत मुक्ती मोर्चाचे राज्यस्तरीय अधिवेशन

सोलापूर : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, ललित कला भवन, चौक्स कॉलनी, नागपूर येथे रविवार दि. १ ऑक्टोबर रोजी भारत मुक्ती मोर्चाचे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्र अदिवासी विकास परिषदेचे राज्य सचिव सुनिता मरसकोल्हे यांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी संगीता शिंदे, सुचिता खोब्रागडे, प्रतिभा उबाळे हे मार्गदर्शन करणार आहेत. भारत मुक्ती मोर्चाच्या महिला प्रभारी उषा थोरात यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनास मोर्चाच्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर जिल्हाध्यक्षा धनश्री सिध्दगणे यांनी केले आहे.

डॉ. शिवराज बुर्गुल यांचे निधन

सोलापूर : इंग्लंडमध्ये वैद्यकीय सेवा बजावत असलेले शहराचे सुपुत्र डॉ. शिवराज राजाराम बुर्गुल यांचे बुधवारी वयाच्या ७९ वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. इंग्लंडमधील वॉशिंग्टन शहरात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. शिवराज हे सोलापूरचे माजी महापौर राजाराम बुर्गुल यांचे ज्येष्ठ सुपुत्र होत.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७७५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

शेतकऱ्यांनी दर व काटा यावर विश्वास ठेवून सहकार्य करावे

खासदार धनंजय महाडिक यांचे आवाहन

✔ सुराज्य/मोहोळ

गळीत हंगामासाठी साडेसहा लाख टन उसाची नोंद चालू वर्षी कारखान्याकडे आली आहे. सभासद शेतकऱ्यांनी दर व काटा यावर विश्वास ठेवून पूर्वीप्रमाणेच सहकार्य करून यंदाचा गाळप हंगाम यशस्वी करावा, असे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी केले.

भीमा सहकारी साखर कारखाना (टाकळी सिंकदर) येथे ४८ वी वार्षिक सर्व साधारण सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन विश्वास धनंजय महाडिक हे होते. यावेळी व्यासपीठावर व्हाईस चेअरमन सतीश जगताप, कार्यकारी संचालक सूर्यकांत शिंदे, शिवाजी गुंड, तुषार चव्हाण, दादासाहेब शिंदे, बिभीषण वाघ, तात्या नागटिळक, राजेंद्र टेकळे, बाळासाहेब गवळी, अनिल गवळी, भाजपा तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, सिद्राम मदने, संभाजी कोकाटे, चंद्रसेन जाधव, संतोष सावंत, छगन पवार आदी उपस्थित होते.

प्रारंभी कै पै. भीमराव दादा महाडिक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यकारी संचालक शिंदे यांनी विषय मांडल्यानंतर सभासदांनी हात उंचावून सर्व विषयांना एकमताने मंजुरी दिली. यावेळी बोलताना खा. महाडिक म्हणाले की, बायो सीएनजी ज्यूस टू इथेनॉल मिथेनॉल यासारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून वाहने इथेनॉल वर चालविण्याचा दूरदृष्टी प्रयत्न कारखान्याचे चेअरमन यांनी ठेवला असून तसे त्यांचे प्रयत्नही सुरू आहेत.

चेअरमन विश्वराज महाडिक म्हणाले की, तीन-चार वर्षात कारखान्याचा संघर्ष सुरू होता. बोटावर मोजणे इतक्या कारखान्यांना एनसीडीसी कर्ज मिळाले त्या कारखान्यांमध्ये आपल्या कारखान्याचेही कर्ज मंजूर झाले ते केवळ खासदार धनंजय महाडिक यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे व केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस अजित पवार यांच्यामुळेच. चालू वर्षी कारखान्याच्या वतीने साडेपाचशे बैलगाड्या, साडेचारशे छोटे ट्रॅक्टर गाड्या, १८५ मोठ्या गाड्या, पाच हार्वेस्टर अशी यंत्रणा चालू हंगामात कार्यान्वित होणार असून कारखान्याची सध्या परिस्थितीत आर्थिक स्थिती अत्यंत चांगले असून बिलाला यावर्षी कोणताही अडथळा येणार नसल्याचेही कारखान्याचे अध्यक्ष विश्वराज महाडिक यांनी सांगितले.

यावेळी भीमा कारखान्याचे नामांतर करून काही भीमराव दादा महाडिक सहकारी साखर कारखाना असे नामकरण करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.यावेळी कार्यालयीन अधीक्षक भाऊसाहेब जगताप, राजाराम बाबर, झाकीर मुलाणी, भारत पाटील, किसन जाधव, दिगंबर माळी, शिवाजी शेंडगे, लिंगराज शेंडगे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, सभासद शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग ताटे यांनी केले.

उपपदार्थाची निर्मिती करणे गरजेचे :

कारखाना कार्यस्थळावर डिस्टलरी व इथेनॉलची चिमणी उभारण्याचा प्रयत्न आहे. उपपदार्थाची निर्मिती करणे गरजेचे आहे. फक्त साखर निर्मिती करणारे अनेक कारखाने बंद पडले आहेत. दोन लाख लिटर प्रतिदिन क्षमतेची डिस्टलरी मंजूर झाले असून दीड लाख लिटर प्रतिदिन क्षमतेचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार आहे. यामध्ये थेट उसाच्या रसापासून इथेनॉल बनवू शकतो साखर व उपपदार्थ निर्मिती मधूनच शेतकऱ्यांना जास्तीचा दर देण्यासाठी फायदा होईल, असे चेअरमन विश्वराज महाडिक यांनी सांगितले.

अल्पवयीन मुलीच्या विनयभंगप्रकरणी एकास दोन वर्ष कारावासाची शिक्षा

✔ सुराज्य/सोलापूर

नववी मध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी महादेव चंदू पवार (रा. कुर्डूवाडी, ता. माढा) याला न्यायालयाने दोन वर्ष कारावासाची शिक्षा व एक हजार रुपये दंड ठोठवला आहे.

पवार याच्याविरुध्द बार्शी सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. खटल्याच्या सुनावणी वेळी सरकार पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पीडित अल्पवयीन मुलीची साक्ष महत्वाची ठरली पीडित मुलीने आरोपी हा तिचा वारंवार पाठलाग करून तिचा लैंगिक छळ करत असल्याचे साक्षीवेळी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. खटल्यामध्ये पीडित मुलीची आई , नेत्र साक्षीदार रिक्षाचालक तसेच तपासिक अधिकारी पो. उप. निरीक्षक बेद्रे यांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. खटल्याची सुनावणी पूर्ण होऊन बार्शी येथील विशेष सत्र न्यायाधीश जयेंद्र सी. जगदाळे साहेब आरोपी महादेव चंदू पवार यास दोषी धरून दोन वर्ष कारावासाची शिक्षा व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यामध्ये अभियोग पक्षातर्फे ॲड. प्रदीप बोचरे, डी. डी. देशमुख यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पो. कॉ. अतुल पाटील व पो.ना. भाऊराव शेळके यांनी काम पाहिले. फिर्यादीतर्फे ॲड. आय. के. शेख व योगेश साठे यांनी काम पाहिले.

अक्कलकोट काँग्रेसची जनसंवाद यात्रा एक आठवड्यानंतर

✔ **अक्कलकोट** : माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांची १ ऑक्टोबर तारखेपासुन सुरू होणारी जनसंवाद यात्रा काही कारणास्तव एक आठवडा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे अल्पसंख्यांक अध्यक्ष अश्पाक बळोरगी यांनी दिली. या वेळी शिवराज म्हेत्रे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रविण शटगार उपस्थित होते. अक्कलकोट तालुक्यातील जनतेच्या विविध समस्यांवर, महागाई, बेरोजगारी, अन्यायी कायदा व सुव्यवस्थेबाबत त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांच्याकडुन संपुर्ण अक्कलकोट तालुक्यात १ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोंबर पर्यंत जनसंवाद पदयात्रा काढण्यात येणार होते. पण ही जनसंवाद यात्रा एक आठवडा पुढे ढकलण्यात आली आहे. लवकर च पुन्हा एकदा सभा घेऊन तारीख जाहीर करण्यात येणार आहे अशी माहिती अल्पसंख्यांक अध्यक्ष अश्पाक बळोरगी यांनी दिली. या बैठकीत शिवराज पोमाजी, रवी वरनाळे, गुरु म्हेत्रे, मल्लिकार्जुन हत्ते, विकी चौधरी, पवन पवार, बसवराज बनसोडे, राजु म्हेत्रे, शशिकांत कळसगोडा, मल्लिनाथ भासगी, राहुल मोरे, शबाब शेख, सुधीर सोनकवडे, सातलिंग गुंडरगी या सह तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्ते

सांगोला येथे दोघा चोरट्यांना अटक

✔ सुराज्य/सोलापूर

सांगोला येथील चिंचोली रोडवर पोलिसांनी दोघा चोरट्यांना पकडून ५० हजाराचे मोबाईल आणि इतर चोरीचे साहित्य जप्त केले. ही कारवाई शुक्रवारी पहाटेच्या सुमारास करण्यात आली. अजय मायप्पा पुटूकडे (वय २१) आणि प्रकाश तानाजी बिचुकले (वय २५ दोघे रा. हंगरगे रोड सांगोला) असे अटकेतील आरोपींची नावे आहेत. ते दोघे शुक्रवारी पहाटे २ वाजेच्या सुमारास चिंचोली रोडवरून फिरत होते. त्यावेळी प्रेम दिवसे या पोलीस शिपायाने त्यांना पकडून वरील माल जप्त केला. आणि त्यांचा विरुद्ध सांगोला पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास हवालदार व्हरे करीत आहेत .

देशात संकल्प सप्ताहाचा शुभारंभ

सोलापूर जि. प. मध्ये झाले प्रक्षेपण

✔ सुराज्य/सोलापूर

पंतप्रधान मंत्री नरेंद मोदी यांच्या दिल्ली येथील संकल्प सप्ताह उद्घाटन सोहळ्याचे प्रक्षेपन सोलापूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आभासी पध्दतीने आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, बालविकास प्रकल्प अधिकारी सुवर्णा जाधव प्रमुख उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या निती आयोगामार्फत राबविल्या जात असलेल्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाच्या धर्तीवर 'महत्वकांक्षी तालुका कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पंतप्रधान यांच्या नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ३० सप्टेंबर रोजी भारत मंडप, नवी दिल्ली येथे 'संकल्प सप्ताह' कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाकरीता जिल्हा स्तरावरील अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, सांगोला गटविकास अधिकारी आनंद लोकरे व अक्कलकोटचे गटविकास अधिकारी सचिन खाडे हे नवी दिल्ली येथे कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

प्रास्तविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी केले. उप मुख्य कार्यकारी अमोल जाधव यांनी गावाचा व तालुक्याचा विकास करताना स्वच्छता हा घटक महत्वपूर्ण आहे. १ ऑक्टोबरला सकाळी १० वाजता १ तास स्वच्छता श्रमदानासाठी द्या असे आवाहन केले. सूत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. तर. उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अधिक्षक झेड ए शेख, वैभव आहाळे, महावीर काळे, अमोल महिंद्रकर यांनी परिश्रम घेतले.

ग्रामविकासासाठी एकत्र यावे : आ. कल्याणशेट्टी

अक्कलकोट तालुका हा राज्याच्या टेलला असलेला तालुका आहे. बाजूस कर्नाटक राज्य लागते. विकासा पासून दूर राहिलेल्या या तालुक्याची निवड पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील १०० तालुक्यासाठी केली आहे. ग्रामविकास हा लोकसहभागा शिवाय अशक्य आहे. ग्रामविकासासाठी एकत्र यावे, असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

दोन शेळ्या चोरल्या; बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा

✔ **सोलापूर** : पत्रा शेडमध्ये बांधलेल्या दोन शेळ्या बोलेरो मोटारीतून आलेल्या चोरट्याने पळवून नेले. ही चोरी शेलगाव (ता.करमाळा) येथे गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडली. या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी एमएच२४-एल-८९७५ या बोलेरो मोटारीचा चालक राहुल अनिल शिंदे (रा. तेरखेडा जि. उस्मानाबाद) याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात समाधान दादासाहेब सांगडे (रा. शेलगाव) यांनी करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली. ते पत्रा शेडमध्ये आपली जनावरे बांधली होती. पहाटेच्या सुमारास मोटारीतून आलेल्या राहुल शिंदे याने ९ हजार रुपये किमतीच्या दोन शेळ्या चोरून नेल्या . असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . हवालदार ढवळे पुढील तपास करीत आहेत.

वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कल्याणकारी मंडळासाठी सहकार्य : आ. शहाजी बापू

✔ सुराज्य/सांगोला

संपादक, पत्रकार व वाचक यांचा वृत्तपत्र विक्रेता हा दुवा आहे. पेपरला आलेली बातमी वाचकापर्यंत पोहोचविण्याचे काम वृत्तपत्र एजंट करतात. परंतु याकडे सर्वांचे दुर्लक्ष होते व ते वंचित राहतात तर आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना समक्ष भेटून त्यांच्यासाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करा यासाठी आवाज उठवू, अशी ग्वाही आ. शहाजीबापू पाटील यांनी दिली.

वृत्तपत्र विक्रेता सांगोला शहर व ग्रामीण यांच्यासाठी वेदांत हॉस्पिटल सांगोला येथे भरविण्यात आलेल्या रोगनिदान शिबिरात ते बोलत होते. यावेळी माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील उपस्थित होते.

ऊन वारा पाऊस यांची तमा न बाळगता वृत्तपत्र विक्रेता आपली सेवा चोख बजावत असून त्यांनी कोरोना काळात ही फार मोठी योगदान दिले. त्यांची दखल घेऊन वेदांत मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल तर्फे पत्रकार संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सतीश सावंत यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित केले. वृत्तपत्र विक्रेत्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष होत आहे तरी त्यांच्यासाठी कल्याणकारी मंडळ शासनाने स्थापन करावे अशी मागणी यावेळी संघटनेचे तालुकाध्यक्ष रविराज शेटे, दत्तात्रय पवार यांन केली. यावेळी आमदार शहाजी बापू पाटील व माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांचा अध्यक्ष रविराज शेटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात. भाजपा जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार यांचा सत्कार संघटनेचे खजिनदार उत्तम चौगुले यांच्या हस्ते तर सतीश सावंत यांचा सत्कार संघटनेचे उपाध्यक्ष अमोल बोत्रे यांच्या हस्ते करण्यात आला

यावेळी माजी नगरसेवक आनंद घोंगडे, अंबादास कदम, दादासाहेब वायमोडे, डॉ. परेश खंडागळे, डॉ संतोष पाटील, डॉ. बिपिन जगताप, डॉ. महावीर आलदर, डॉ. विनायक डमकले, पत्रकार विठ्ठल देशपांडे, महेश जम्मा, सचिन धांडोरे, चांगदेव कुंभार, वृत्तपत्र एजंट संगीता चौगुले, सिंधू जानकर, लतिका मेटकरी, बनुताई जाधव, अशोक जानकर, संजय पवार, बाबुराव पवार, भानुदास जाधव, बाळू निमकर, जावेद सय्यद, बाबू चांदणे, गोरख भंडगे, विकास बोत्रे, संतोष गाडेकर, पांडू खटकाळे, राम निमकर, सानिका सावंत, सतीश जाधव, हरिदास मिटकरी, समाधान धानोरे, सुदर्शन वायमारे, अक्षय क्षीरसागर, संजय येलपले, स्वप्नाली पवार, सुनील पवार, अविनाश जानकर, उपस्थित होते. संघटनेचे खजिनदार उत्तम चौगुले यांनी आभार मानले.

न्यासाकडून ऑनलाईन महाप्रसाद बुकींग सेवा सुरु

✔ सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंडळाकडून स्वामी भक्तांना विविध सोयी सुविधे बरोबरच अन्नछत्र मंडळातील भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे न्यासाकडून ऑनलाईन महामप्रसाद बुकींग सेवा सुरु केलेली आहे.

अन्नछत्र मंडळ हे स्वामी भक्तांच्या सेवेर्थ गेल्या ३६ वर्षापासून कार्यरत आहे. भक्तांची उत्तम सेवा घडावी याकरिता अनेक उपक्रम राबवित असून यामध्ये आता ऑनलाईन महाप्रसाद बुकींग सेवेचा भर पडलेला आहे.

अन्नछत्र मंडळातील भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे तसेच काही स्वामीभक्तांना वेळेअभावी रांगेत महाप्रसाद घेणे शक्य होत नाही. यासाठी न्यासाने महाप्रसादास येणाऱ्या सर्व भक्तांसाठी मोफत ऑनलाईन महाप्रसाद बुकींगची व्यवस्था केली आहे. https://www.swamiannacchatra.org या वेबसाईटवर जाऊन तेथे असलेल्या ऑनलाईन महाप्रसाद बुकींग ह्या बटनाला क्लिक करावे. त्यानंतर पुढील तीन महिन्यासाठीच्या तारखेस, तिथीचे विवरण दिसेल. कॅलेंडरवरील आपल्याला ज्या तारखेस/तिथीस महाप्रसाद घ्यायचे आहे. त्या तारखेवर क्लिक करावे. फॉर्म भरावा आणि सबमिट करावेत. सबमीट केल्यानंतर आपणास ई-मेलवर एक बुकींग कन्फर्मेशन पीडीएफ मिळेल. हे डाऊनलोड करावेत आणि प्रवेशाच्यावेळी प्रवेशव्दारावर दाखवावेत. ऑनलाईन महाप्रसाद बुकींग करण्यासाठी आपला फोटो व मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.

तसेच एका वेळेस जास्तीत जास्त पाच जणांसाठी बुकींग करता येणार आहे. ऑनलाईन महाप्रसाद दुपारी १२.३० ते ४ आणि रात्री ८.३० ते १० या वेळेत निर्धारित करण्यात आली आहे. त्यानंतर रांगेतून महाप्रसाद घ्यावा लागणार आहे. तरी याचा लाभ स्वामी भक्तांनी घ्यावे असे आवाहन न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी केले आहेत.

विठठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., गंगामाईनगर
पो.पिंपळनेर, ता. माढा, जि. सोलापूर ई-मेल आयडी - vs.sugar@gmail.com

फ्रिसेल साखर, ई.एन.ए.,आर.एस,एस.डी.एस विक्री टेंडर नोटीस

आमच्या साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब येथे सन २०२२-२३ गळीत हंगामामध्ये उत्पादीत झालेल्या साखरे पैकी माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये खुली साखर तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या आसवणीमध्ये उत्पादीत झालेले उत्तम प्रतिचे ई.एन.ए., आर.एस., एस.डी.एस.खालील तारखांना खुल्या बाजारात टेंडर पध्दतीने विक्री करावयाचे आहेत.

अ.नं.	टेंडर दिनांक	वार	अ.नं.	टेंडर दिनांक	वार
१.	०२/१०/२०२३	सोमवार	२.	०५/१०/२०२३	गुरूवार
३.	०९/१०/२०२३	सोमवार	४.	१२/१०/२०२३	गुरूवार
५.	१६/१०/२०२३	सोमवार	६.	१९/१०/२०२३	गुरूवार
७.	२३/१०/२०२३	सोमवार	८.	२६/१०/२०२३	गुरूवार
९.	३०/१०/२०२३	सोमवार			

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी व पार्टीनी आपले टेंडर सिलबंद/फॅक्स/ई-मेल द्वारे वरील तारखांना सांय.५.०० वाजेपर्यंत कारखाना ऑफिसमध्ये द्यावीत.कार्यालयात टेंडर मंजूर झाल्यास प्रती पोत्यास रू.५०/-प्रमाणे व प्रती लिटर रू.१०/-प्रमाणे डिपॉझीट ताबडतोब भरणेचे आहे. करारपत्र करून दिलेनंतर त्याचे पालन करणे खरेदीदारास बंधनकारक राहील.विक्री करावयाचे परिमाण व उचलणेची शेवटची तारीख त्या त्या दिवशी कळविणेत येईल.टेंडर मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार कारखान्याकडे राहील.यासंबंधी काही माहीती हवी असल्यास कारखाना कार्यालयात ऑफिस वेळेत संपर्क साधावा.

एस.आर.यादव, जनरल मॅनेजर(युनिट नं.२) | एस.एन.डिग्रजे, कार्यकारी संचालक | वामनराव प्रल्हाद उबाळे, व्हाईस चेअरमन | आ.बबनराव विठ्ठलराव शिंदे, संस्थापक चेअरमन

विजयरत्न पशुपक्षी संवर्धन संघाची सभा

सोलापूर : विजयरत्न सहकारी पशु पक्षी संवर्धन संघ मर्यादित शंकरनगर अकलूजची ३१वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. पतसंस्थेचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील हे संस्थापक असून व राजसिंह मोहिते पाटील हे संस्थापक अध्यक्ष आहेत. यावेळी प्रथमतः सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व स्वर्गीय श्रीमती आक्कासाहेब उर्फ रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शक संचालक धैर्यशील मोहिते पाटील, अध्यक्ष दत्तात्रय भिलारे, उपाध्यक्ष शहाजी धायगुडे, संचालक प्रभाकर गमे पाटील, अण्णासाहेब कदम, नारायण ताटे देशमुख, मानसिंग मोहिते, अरुण शिंदे, मोहन लोंढे, श्रीमती लक्ष्मीबाई रोमन, सौ हर्षाली निंबाळकर आदी मान्यवर संचालक बांधवासह सभासद उपस्थित होते याप्रसंगी कार्यकारी संचालक रवींद्र जवळेकर यांनी विविध विषयांचे वाचन केले याला सर्व सभासद बांधवांनी मंजुरी दिली. सुजित तरंगे यांनी आभार व्यक्त केले.

कर्मवीरांचा शिक्षणाचा महामंत्र देशाने स्वीकारला : प्रा. खिलारे

पिलीव : रयत शिक्षण संस्थेने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घालून दिलेल्या सोशल इंजिनिअरिंगचा मूलभूत महामंत्र कमवा आणि शिका हा आज केंद्र शासनाने राबण्याचा निर्णय घेतला आहे. अण्णांचा शिक्षणाविषयीचा मूलभूत दुर दृष्टिकोन आपल्या निदर्शनात येत आहे, असे प्रतिपादन के.बी. पी. कॉलेज चे प्राचार्य सी जे खिलारे यांनी केले. पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेज येथे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित बक्षीस व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष माजी प्राचार्य जे.बी धायगुडे, प्रमुख पाहुणे प्राचार्य सी.जे. खिलारे ,गणेश पाटील, संग्राम पाटील ,संभाजीराव भोसले, प्राचार्य शिवाजीराव कापसे,प्रा. एस.एस.पाटील, रेक्टर एस.आर.जाधव, सरपंच नितीन मोहिते, उपसरपंच सोनाली करमाळकर आदी उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविकात जेष्ठ शिक्षक डी.डी. माळी यांनी केले. सूत्रसंचालन सुवर्णा लिंगे, सत्यवान वाघमारे ,नितीन माने यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका श्रीमती पी.आर मोरे यांनी केले.

सुंदरसागर महाराजांच्या सानिध्यात दशलक्षण महापर्वाचा उपवास

नातेपुते : नातेपुते येथील श्रावक वैभव सुरेंद्र शहा, विराग राजेंद्र गांधी, ओम प्रितम गांधी, समय संजय गांधी यांनी जैन धर्मात पवित्र मानला जाणारा उपवास दशलक्षण महापर्व हा आचार्य श्री १०८ सुंदरसागर महाराज यांच्या सानिध्यात राजस्थान येथील सागवाडा या ठिकाणी केला. जैन धर्मात या उपवासाला खूप महत्त्व आहे. आचार्य श्री १०८ सुंदरसागर महाराज यांनी देखील या पर्व मध्ये निर्जन असा कडक काहीही न खाता-पिता उपवास केला होता. श्रावक वैभव सुरेंद्र शहा, विराग राजेंद्र गांधी व ओम प्रितम गांधी, समय संजय गांधी यांच्या कुटुंबि यांनी हे घरी आल्यानंतर त्यांचे औक्षण स्वागत करून केले.

बार्शी शहर व तालुक्यातील गणरायाला भावपूर्ण निरोप

सुराज्य/बार्शी

गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशा घोषणा देत बार्शी शहर व तालुक्यातील गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप दिला. नगरपालिकेच्यावतीने संकलित करण्यात आलेल्या शहरातील गणेश मूर्तीचे गणेश तलाव येथील कृत्रिम हौदात विसर्जन करण्यात आले. तसेच शहरातील नागरिकांनी व कांही मंडळांनी गणेश तलाव व राऊत तळे येथे श्री गणेश मूर्तीचे विसर्जन केले. गणेश विसर्जनाच्या सहा मंडळांनी मिरवणुका काढल्या होत्या त्या शांततेत पार पडल्या.

नगरपालिकेच्यावतीने शहराच्या विविध भागात एकूण १० ठिकाणी गणेश मूर्ती संकलनाची सोय केली होती. शहरातील नागरिकांनी संकलन ठिकाणी पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडे मूर्ती दिल्या. सुमारे ३०० कर्मचाऱ्यांनी संकलनाचे काम केले. संकलित मूर्ती गणेश तलाव येथील कृत्रिम हौद येथ नेवून विसर्जित करण्यात आल्या. यासह गणेश तलाव व राऊत तळे येथेही त्या त्या भागातील नागरिकांसह कांही मंडळातील नागरिकांनी जावून श्री गणेश मूर्ती विसर्जन केले. गणेश तलाव व राऊत तळे येथे पालिकेच्या कर्मचाऱ्यांसह पोलीस बांधवांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी व मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांच्या योग्य समन्वयातून गणेश विसर्जन शांततेत झाले.

बार्शीतील सामाजिक संघटनांचीही मदत

नगरपालिका तसेच पोलीस प्रशासनाला बार्शी शहरातील सामाजिक संघटनांची याकामी मदत झाली. पोलीस जाणीव सेवा संघ, जाणीव फाऊंडेशन, वृक्ष संवर्धन समिती, ओन्ली समाजसेवा आदी संघटनांनी नगरपालिका तसेच पोलीस प्रशासनाला सहकार्य केले. मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी त्यांचे आभार मानले.

सहा मंडळाच्या मिरवणुका

बार्शी शहरात गणेश विसर्जनाच्या सहा मिरवणूका निघाल्या होत्या. यामध्ये चाटे कोचिंग क्लासची मिरवणूक लक्षवेधक होती. एकाच पेहरावातील मुलींनी लेझीम सादर करत सवादय मिरवणूकीने गणरायाला निरोप दिला. यासह आडवा रस्ता, सोलापूर रोड येथील मंडळासह एकात्मता गणेश, वाडियाराज आदी मंडळांनी मिरवणूका काढून गणरायाला वाजतगाजत निरोप दिला. सर्व मिरवणूका शांततेत पार पडल्या.

महिला मंडळाचा गणेशाचे विसर्जन

महिलांनी पुढाकार घेवून श्रींची प्रतिष्ठापना केलेले व मंडळात सर्व महिला सदस्य असे अ शहरातील उपळाई रोड श्रीकृष्ण कॉलनी येथील गोपिका ग्रुप यांच्यावतीने श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. हे एकमेव मंडळ होते. या मंडळाने विविध सामाजिक उपक्रमही राबवले. मंडळाने उत्साहात गणरायाला निरोप दिला.

लऊळ येथे एकाच रात्रीमध्ये दहा ठिकाणी घरफोडी

सोलापूर : लऊळ (ता. माढा) येथील गणेश विसर्जनाच्या पुर्व संध्येला अज्ञात चोरट्यांनी दहा ठिकाणी घरफोडी केली. रोख रक्कम, चांदी, पैंजण जोड व गंठण चोरी केली आहे. बऱ्याच ठिकाणी काही न मिळाल्याने घरातील सामानाची तोडफोड केली आहे. गावातील एका दवाखान्याच्या दरवाज्याचे लोखंडी ग्रील तोडत असताना सीसिटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे. २८सप्टेंबर गुरुवारी पहाटे २.३० च्या ते पहाटे ४.०० वाजण्याच्या दरम्यान चोरट्यांनी केले आहे. पंचशील नगर येथील मुक्ताबाई लोंढे (वय-७८), रामभाऊ जानराव (वय-५५), अण्णाभाऊ साठे नगर येथील सुनील वाघमारे (वय-५०), दत्ता शिंदे (वय-३४),नंदा कांबळे, नागनाथ कोंडीराम चांदणे (वय-४५), रोहीदास नगर मधील डॉ प्रविण चोपडे यांच्या माऊली क्लिनिक व डिकोळे गल्ली येथील संजय डिकोळे (वय-४३), राजाराम डिकोळे (वय-५५), यांच्या घराची कटावणी ने कोयंडे काढून घरातील साहित्याची तोडफोड केली आहे. अर्जुन डिकोळे (वय-५०) यांच्या घरातील पैंजण जोड व गंठण, व रोख रक्कम एकुण एक लाखाच्या रकमेची चोरी झाली असल्याचे त्यांनी सकाळ प्रतिनीधीशी बोलताना सांगितले. पोलीसांनी चोरीच्या ठिकाणांची पाहणी केली असून तक्रार देण्यासाठी आवाहन केले आहे. एकाच रात्रीमध्ये दहा ठिकाणी चोरट्यांनी बंद असलेली वृध्द व्यक्ती राहत असलेली व इतरांच्या घरांच्या कडी लावुन चोरी केल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत्यूस कारणीभूत; अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात ट्रकचालकाविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २० सप्टेंबर रोजी रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास कोंडानगर जुना अक्कलकोट नाका ब्रिज जवळ घडली.फिर्यादी सूर्यकांत बसवण्णा सद्दलगी (वय-४०,रा.मु.पो.वळसंग) यांचे भाऊ चंद्रकांत बसवण्णा सद्दलगी (वय-२८) हे कामावरून घरी जात असताना कोंडा नगर येथे आले असता वळसंग कडे जाणारा ट्रक क्र.एमएच.४५.एएस ७३२३ यातील चालक याने भरधाव वेगाने ट्रक अचानक रिव्हर्स मागे घेऊन फिर्यादी यांच्या मोटरसायकल क्र.एमएच.१३.सी.डब्लू.१३४९ ला जोराची धडक देऊन गंभीर दुखापत करून मृत्यूस कारणीभूत ठरला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.याप्रकरणी सूर्यकांत सद्दलगी यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केले असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात ट्रकचालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

दूध उत्पादक बांधवांनी बायोगॅसचा वापर करावा : धैर्यशील मोहिते-पाटील

शिवामृत दूध उत्पादक संघाची सभा खेळीमेळीत

सुराज्य/सोलापूर

शिवामृत दूध उत्पादक संघातील सभासदांनी बायोगॅसचा वापर करावा आणि विविध फायदे मिळवावेत यासाठी संघ अनुदान देणार आहे, असे प्रतिपादन शिवामृत दूध उत्पादक संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्यादित विजयनगर अकलूजची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभासद बांधवांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, संघाचे व्हाईस चेअरमन दत्तात्रय भिलारे, तज्ञ संचालक हरिभाऊ मगर,संग्रामसिंह रणनवरे यांच्यासह सर्व संचालक मंडळ, सभासद बांधव व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी छत्रपती दूध व्यवसायिक सहकारी संस्था मर्यादित साळुंखेवस्ती मांडवे आणि शिवामृत संकलन केंद्र कोंडबावी या संस्थांना सर्वात जास्त दूध संकलन व पशुखाद्य खरेदी यामुळे चॅम्पियनशिप ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी कार्यकारी संचालक रविराज इनामदार देशमुख यांनी विषयाचे वाचन केले. यावेळी संघास सलग २५ वर्षे दूध पुरवठा करणाऱ्या संस्था म्हणून जय विजय दूध व्याव. सहकारी संस्था चाकोरे, शंकरराव इनामदार दूध संस्था मांडकी, दत्तप्रताप दूध व्यवसाय संस्था डोंगरवाडी लोणंद, महालक्ष्मी दूध व्याव.सहकारी संस्था मांडवे, रणजीत दूध व्यवसाय सहकारी संस्था पळसमंडळ या संस्थांना गौरविण्यात आले. तर जास्त दूध पुरवठा करणाऱ्या संस्था म्हणून छत्रपती दूध व्यवसायिक संस्था मांडवे, सिध्दनाथ दूध संस्था तामसिदवाडी, श्री शंकर दूध संस्था सदाशिवनगर या संस्थांना गौरवण्यात आले. ज्यादा दूध पुरवठा करणारे संकलन केंद्र म्हणून शिवामृत दूध केंद्र कोंडबावी,शिवामृत दूध केंद्र मांडवे,शिवामृत दूध केंद्र जावळे वस्ती पिलिव या संस्थाना गौरवण्यात आले. सर्वात जादा दर घेणाऱ्या प्रथम संस्था म्हणून पवनसुत दूध संस्था माळखांबी, पद्मजादेवी दूध संस्था पिसेवाडी, मळवली दूध संस्था मळवली यांचा गौरव करण्यात आला तर सर्वात जादा दर घेणारे प्रथम संकलन केंद्र म्हणून शिवामृत दूध संकलन केंद्र जावळेवस्ती पिलीव, शिवामृत दूध संकलन केंद्र कारखेल, अमर पाटील यांनी गोबर गॅस प्लांट संदर्भात माहिती दिली. संचालक अरविंद भोसले यांनी आभार मानले.

माळशिरस तालुक्यातून बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित राहणार

हैद्राबाद येथे रिपाइंचा वर्धापन दिन

सुराज्य/वेळापूर

रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या उपस्थितीत तेलंगणा हैदराबाद येथे ३ ऑक्टोबर रोजी रिपब्लिकन पक्षाचा ६७ वा वर्धापन दिन साजरा होत आहे. या वर्धापन दिनास माळशिरस तालुक्यातून बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका कार्यकारिणीची आढावा बैठक विद्यमान तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली अकलूज येथील शासकीय विश्रामगृह येथे झाली. याप्रसंगी हैद्राबाद येथे वर्धापन दिनास बहुसंख्येने कार्यकर्ते उपस्थित राहणार, जनतेच्या जीवनाशी निगडित समस्या विद्यार्थ्यांच्या समस्या बाबत आंदोलन करणे, रिपब्लिकन आपल्या दारी या अभियाना अंतर्गत पक्षाचे क्रियाशील सभासद वाढविणे,गाव तेथे शाखा निर्माण करणे,इत्यादी विषयावर चर्चा करण्यात आली.

यावेळी प.महा. उपाध्यक्ष एन. के. साळवे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे,जेष्ठ नेते शामराव भोसले, भारत आठवले, तुकाराम बाबर, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे,सरचिटणीस मारुती खांडेकर,कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक आघाडी तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे,अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, संघटन सचिव पोपट गेजगे, मार्गदर्शक प्रा भास्कर बनसोडे,कोषाध्यक्ष समीर सोरटे,युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, विध्यार्थी परिषद अध्यक्ष सुचित साळवे,पत्रकार गौतम भंडारे,तालुका उपाध्यक्ष सुनील ओवाळ, उपाध्यक्ष शेखर सावंत, उपाध्यक्ष बापूसाहेब पोळके,उपाध्यक्ष संतोष कांबळे,संपर्क प्रमुख अण्णासाहेब भोसले, उपाध्यक्ष रामभाऊ कांबळे, संघटक प्रकाश गायकवाड, उपाध्यक्ष महेंद्र लोंढे, प्रसिध्दी प्रमुख मारुती शिंदे, युवक शहराध्यक्ष अभिजीत वाघमारे,दत्तात्रेय तोरणे, नितीन जाधव,प्रकाश कांबळे,पंकज भोसले, वैभव बनसोडे,दिनेश भोसले,रोहन ओवाळ, राजाभाऊ भोसले,प्रशांत बनसोडे,तात्यासो लोंढे, दिलीप भोसले,अशोक खांडेकर,राहुल भोसले, सतिश गायकवाड आदी उपस्थित होते . आभार प्रविण साळवे यांनी मानले.

समाधान नगर येथे घरफोडी

सुराज्य/सोलापूर

घराला कुलूप लावून अनंत चतुर्थी निमित्त मिरवणूक बघण्यासाठी गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घरात कोणी नसल्याचा फायदा घेत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे मिळून एकूण ७ लाख ५२ हजार ४०० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना २८ सप्टेंबर रोजी रात्री साडेसहा ते साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान समाधान नगर येथे घडली.याप्रकरणी लता अमराज बंडा (वय-४५,रा.समाधान नगर,अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई रजपूत हे करीत आहेत.

अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर

सुप्रजा हॉटेल जवळील भागवती टॉवर अपार्टमेंट येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीडी.३६६५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २८ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊ ते साडे अकरा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी संजय व्हनप्पा घोडके (वय-४०,रा.मु.पो.मजरेवाडी गाव,होटगी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गावडे हे करीत आहेत.

शेतकरी कंगाल तर पीक विमा प्रतिनिधी मालामाल

अक्कलकोट तालुक्यात पीक पंचनामा करण्यासाठी शेतकऱ्यांची लुबाडणूक

सुराज्य/अक्कलकोट

शासनाने एकीकडे शेतकर्यांना संकटाच्या काळात एक रूपयात पीक विमा देऊन मोठा दिलासा दिला असताना अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पीक विम्यावर विमा कंपनीचे प्रतिनिधी मात्र डल्ला मारताना दिसत आहेत. पिकांच्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी सध्या विमा कंपनीचे प्रतिनिधी गावोगावी फिरताना दिसतात.शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन विमा प्रतिनिधी चक्क शेतकऱ्याकडून पैसे घेऊन पीक पंचनामा करण्यात येत असल्याचे ओरड सध्या तालुक्यातील शेतकऱ्यामधून सुरु आहे. बिचारा शेतकरी पिक नुकसानीचा भरपाई त्वरित मिळावा म्हणून प्रत्येक उतार्याला विमा प्रतिनिधीला पैस देत असल्याचे सांगण्यात येत आहे.

एकतर शेतकरी अस्मानी संकटात आहे

त्यातच विमा कंपनीचे प्रतिनिधी ही शेतकर्यांची लुबाडणूक करत असल्याने शेतकरी हैराण झाला आहे.आज तालुक्यात हजारो शेतकरी पीक विमा नुकसान भरपाई मिळेल या आशेने पीक विमा भरला आहे. सध्या पिक विम्याचे भरपाई तर नाहीच उलट शेतकऱ्यांना स्वतःच्या खिशातून पदरमोड करुन विमा कंपनीच्या प्रतिनिधीला पैसे द्यावे लागत असल्याने शेतकऱ्यांमधूल संताप व्यक्त केला जात आहे.

पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पीक पंचनामा करण्यासाठी कमी मानधनावर ३० ते ४० मुलांची तालुकानिहाय नेमणूक करण्यात येते. नैसर्गिक आपत्तीनंतर या मुलांनी शेतावर जाऊन पंचनामे करणे अपेक्षित असते.परंतु सध्या असे न होता गावच्या ग्रामपंचायतीत किंवा एखाद्या घरात बसून पंचनामे केले जातात. जो शेतकरी पैसे देईल त्यालाच नुकसान भरपाई मिळते. गरीब, अशिक्षित शेतकऱ्यांचा पंचनामा मात्र केवळ कागदावरच रंगविले जातात.अस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचा पंचनामा करण्यासाठी पैसे मागणार्या या विमा कंपनीच्या प्रतिनिधीला सध्या अद्दल घडवण्याची गरज असल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.

मोबाईल ॲप वर नुकसान भरपाई नोंदवा

सध्या तालुक्यातील ज्या शेतकऱ्यानी पिक विमा भरला आहे ते नुकसान भरपाईसाठी इतर गावांमध्ये जाऊन पैसे देऊन फॉर्म भरत आहेत. शेतकऱ्यांची दिशाभूल करून पैसे घेऊन पीक विमा मिळवून देतो असे म्हणत आहे. कोणतेही नुकसान भरपाईचे फॉर्म चालू नाहीत त्याची नोंद घ्यावी व ज्या दिवशी गावामध्ये चांगल्या प्रमाणात पाऊस होतोय त्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आपल्या मोबाईल ॲप वर जाऊन क्रॉप इन्शुरन्स प वर नुकसान भरपाई नोंदवू शकता तोपर्यंत कोणतेही शेतकरी कोणाच्या आमिष ला बळी पडू नये व अधिक माहितीसाठी कृषी सेवक, तलाठी यांच्या शी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आली आहे.

कुर्डूवाडीत पावसातही विसर्जन मिरवणूक उत्साहात

सुराज्य/कुर्डूवाडी

अनंतचतुर्दशीला गणरायाला निरोप देताना हस्त नक्षत्राच्या मुहूर्तावर वरुण राजालाही गहिवर फुटला आणि सुमारे पाऊणतास जोरदार पावसाच्या सरी बरसल्या. बप्पाच्या ह्या कृपेने या शेवटच्या नक्षत्रावर जोरदार पाऊस होऊन भविष्यातील बळीराजा पर्यायाने सर्वांवरील संकट दूर होणार अशी आशा या निमित्ताने पल्लवित झाल्या आहेत.

छ.शिवाजी महाराज चौक गणेश मित्र मंडळ, पटेल चौक तरुण गणेश मंडळ, झुंजार गणेश मित्र मंडळ, जिजाऊ नगर गणेश मित्र मंडळ, श्री दत्त गणेश प्रतिष्ठान गणेश मंडळ,नवी काडादी चाळ तरुण गणेश मंडळ,बापूसाहेब जगताप युवक गणेश मंडळ आदी सार्वजनिक मंडळांनी ढोलताशाचा गजर ,भगव्या गुलालाची मुक्त उधळण,लेझीम,काठ्या व भगवा झेंडा नाचणारे गणेश भक्त व गणपती बाप्पा मोरया,पुढच्या वर्षी लवकर या असा घोष करित मिरवणूकाने जात नगरपालिका प्रशासनाने नेमून दिलेल्या कुंडांमध्ये विसर्जन करण्यात आले.

घरगुती गणपतींचे विसर्जन सकाळी दहा वाजले पासून सुरू झाले. प्रशासनाने टेंभुर्णी रोड व माढा रोड व नगरपालिका कार्यालय परिसर येथे कृत्रिम जलकुंड उभारुन मूर्ती विसर्जनाची सोय केली होती. तेथे व प्रत्येक सार्वजनिक गणेश मंडळाच्या मिरवणूकीला नगरपालिका व पोलिस प्रशासनाच्यावतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विसर्जन ठिकाणी नगर परिषद कर्मचारी मूर्ती व निर्माल्य वेगवेगळे करून मग मूर्ती विसर्जन होत होते.

पोलीस व नगरपालिका प्रशासनाने संपूर्ण गणेशोत्सव काळात सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवल्याने मिरवणुका व्यवस्थित व शांततेत पार पडल्या. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी येथील पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस स्टेशनमध्ये बसवण्यात आलेल्या गणपती बाप्पांचे वाजत गाजत ढोल ताशांच्या गजरात विसर्जन केले.

नगरपालिका प्रशासनाने यावेळी प्रथमच जलकुंड उभारून तसेच निर्माल्याचे संकलन करुन त्याचे चांगल्या प्रतीचे खत तयार करण्याचा अभिनव उपक्रम सुरु केला तो निश्चितच वाखाणण्याजोगा आहे.त्याचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

सिद्धेश्वर कारखाना चालवून दाखवू : काडादी

✔ सुराज्य/सोलापूर

सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना अनंत अडचणीतून मार्गक्रमण करीत असून सभासदांच्या सहकार्याने वेगळ्या पध्दतीने येत्या हंगामात कारखाना सुरू करण्यात येणार असल्याची ग्वाही कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी दिली. सभासदांनी आपला ऊस सिध्देश्वरलाच देण्यासाठी राखीव ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

शुक्रवारी, कारखान्याच्या कर्मयोगी अप्पासाहेब काडादी सांस्कृतिक भवन येथे श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची ५४वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. त्यावेळी काडादी बोलत होते. प्रारंभी ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर आणि कारखान्याचे संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेचे पूजन कारखान्याचे संस्थापक सभासद शिवराया गंगदे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत कारखान्याचे अध्यक्ष अण्णाराज ऊर्फ पुष्पराज काडादी यांनी केले. कारखान्याचे कार्यकारी संचालक रवींद्र पाटील यांनी विषय पत्रिकेवरील विषयांचे वाचन केले.

कारखाना चालू करण्यासाठी अनेक अडचणी समोर आहेत. परंतु वेगळ्या पध्दतीचा अवलंब करून कारखाना चालू करण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याची ग्वाही काडादी यांनी दिली. प्रशासन सहकारी साखर कारखान्यांना मदतीचा हात देण्याऐवजी त्यांना मुद्दामहून अडचणीत आणण्यात येत आहे. संस्थेला हीन पध्दतीने देण्यात येत असलेली वागणूक निषेधार्हच असल्याचे काडादी हणाले.

या चर्चेत शेतकरी संघटनेचे शिवानंद दरेकर, सिद्रामप्पा अबदुलपूरकर, अख्तरताज पाटील आदींनी भाग घेतला होता. या सभेस खास करून अक्कलकोट संस्थानचे मालोजीराजे भोसले यांच्यासह कारखान्याचे आजी-माजी संचालक, सभासद, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन कारखान्याचे सचिव सिध्देश्वर शीलवंत यांनी तर आभार उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते यांनी केले.

स्वामी समर्थ कारखान्याचा प्रस्ताव

कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांनी सभासदांच्या सहकार्यातून दूरदृष्टीने कारखान्याची उभारणी केली. आता कारखाना विस्तारावर मर्यादा आहेत. तेव्हा अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ साखर कारखान्याचे प्रमुख सिद्रामप्पा पाटील यांनी सदर कारखाना विकत घेण्याबद्दल अथवा भाडेतत्त्वावर चालविण्याबाबत दिलेल्या प्रस्तावावर सभासदांनी सर्वांच्या कल्याणासाठी विचार करावा, सहकार्याची भूमिका घ्यावी, असे आवाहन धर्मराज काडादी यांनी केले.

चिमणीसाठी परवानगी देण्यास नाहक त्रास

१५ जून रोजी चिमणी पाडण्यात आली. चिमणी बांधकामासाठी ३० मीटरचीही परवानगी देण्यात आली नाही. चुकीच्या पध्दतीने चिमणी पाडून कारखान्यावर अन्याय करण्यात आला. गेल्या चार महिन्यांपासून चिमणी बांधण्यासाठी परवानगी देण्यास जाणीवपूर्वक नाहक त्रास देण्यात येत आहे. तरीही वेगळ्या पध्दतीने मार्ग काढून कारखाना सुरू करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

महिलांना मुबलक रोजगाराच्या संधी उपलब्ध : हणमंत नलावडे

✔ **सोलापूर :** आजच्या युगात प्रत्येक क्षेत्राचा वेगाने विस्तार होत आहे. या प्रत्येक क्षेत्रात मुबलक रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. पण त्याला अनुसरुन कौशल्य प्राप्त करणे आवश्यक आहे तरच महिलांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतील, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा कौशल्य विभागाचे सहाय्यक आयुक्त हणमंत नलावडे यांनी केले. पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालय व महाराष्ट्र विकास रोजगार व उद्योजकता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय महिला रोजगार मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्या उद्‌घाटन समारंभप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्थेचे सचिव दिनेश यन्नम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी, आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. डॉ. ॲनी जॉन, डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. शिवानंद भांजे आदी मान्यवर उपस्थित होते.

नलावडे पुढे म्हणाले की, 'आज रोजगार प्राप्त करण्यासाठी संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे पण त्याचबरोबर मराठी व इंग्रजी भाषेच्या टंकलेखनाचे ज्ञानही आवश्यक आहे. हे ज्ञान नसल्यामुळे अनेक जण रोजगारापासून वंचित राहतात.' प्रास्ताविक प्रा. डॉ. रजनी दळवी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नानासाहेब गव्हाणे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. शंकर राजे यांनी मानले.

नदाफ पतसंस्था सभासदांना दहा टक्के लाभांश देणार

✔ **सोलापूर :** अल्पसंख्याक समाजातील अग्रगण्य असलेल्या नदाफ नागरी सहकारी पतसंस्थेची २३वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात पार पडली. पतसंस्थेने सभासदांना १० टक्के लाभांश देण्याचे जाहीर केले.

सभा संपल्यानंतर सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या कार्यकर्त्यांचा, आदर्श शिक्षकांचा प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच आदर्श सभासदांचे व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचे सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन त्यांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जमियतुल मन्सुरचे प्रदेश अध्यक्ष आरिफ मन्सुरी होते तर विशेष अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष शफी इनामदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष भारत जाधव, माजी नगरसेवक अमोलबापू शिंदे, सरफराज अहमद, साहित्यिक सैपन नदाफ, हाजी मलंगशेठ शेख आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सरदार नदाफ यांनी केले तर उपस्थितांचे आभार जॉ. सेक्रेटरी डॉ. साकीब नदाफ यांनी मानले. सभेस पतसंस्थेचे सभासद, पालक, विद्यार्थी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणराज शरीर सौष्ठव स्पर्धेत रेवण व्यंकट मानकरी

✔ **सोलापूर :** उमरगा येथे सोलापूर, लातूर व उस्मानाबाद जिल्हा मर्यादित शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण ४५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धा ५ वजनी गटात घेण्यात आल्या. प्रत्येक गटातील प्रथम चार क्रमांकांना रोख बक्षिस, सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धा लिमरा हेल्थ क्लब, उमरगा यांच्यावतीने आयोजित करण्यात आल्या होत्या.

रेवण व्यंकट (उमरगा) हा स्पर्धेचा मानकरी ठरला. त्याला रोख रुपये ११,०००/-, सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले व सोलापूरचा प्रवीण सराटे याला मोस्ट इम्प्रुव्हड म्हणून सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेसाठी सोलापूरचे नजीर शेख, शफी शेतसंदी, शकील बडेघर व संतोष कुलकर्णी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी सोलापूर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, मनोज भागवत, अजित कंडरे, प्रमोद काटे, गोरख गडसिंग, अल्ताफ सिध्दीकी यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

कुमठे प्रशालेत विज्ञान प्रयोगाचे प्रात्यक्षिकेद्वारे सादरीकरण

✔ **सोलापूर :** गणेशोत्सवानिमित्त कुमठे प्रशाला, कुमठे येथे विज्ञान प्रयोगाचे प्रात्यक्षिकेद्वारे सादरीकरण करण्यात आले.

प्रथमत: संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. ब्रह्मदेवदादा माने यांच्या प्रतिमेचे पुजन संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त प्रा. स्वाती माने तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड, उपमुख्याध्यापक प्रकाश काशीद, पर्यवेक्षक मलकारी कोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्त राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श विज्ञान शिक्षक सिध्देश्वर म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व व विज्ञानाचे प्रयोग करुन दाखविले. त्यांनी न्यूटनचे तीनही नियम प्रयोगाद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच विद्यार्थ्यांना खेळामागील वैज्ञानिक महत्त्व सांगितले. विमानाचे उड्डाण कसे होते, यामागील वैज्ञानिक कारण सांगितले. तसेच लहान चमत्कारिक प्रयोगातून विद्यार्थ्यांना त्यामागील तंत्रज्ञान समजावून सांगितले. उदा. रिकाम्या डब्यातून फुले काढणे, अशाप्रकारे सिध्देश्वर म्हेत्रे यांनी विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालून विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करण्याचा विद्यार्थ्यांना महत्त्वाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसंत गुंगे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रकाश काशीद यांनी मानले.

भाषा हे संपर्काचे, संवादाचे सशक्त माध्यम : डॉ. साळुंखे

✔ सुराज्य/सोलापूर

'प्रत्येक देशाची एक सामान्य भाषा असते व या भाषेत देशातील सर्व व्यवहार पार पाडले जातात. भारत एक फार मोठे राष्ट्र आहे. येथे भाषा, धर्म, जाती, पंथ, पोषाख यांची विविधता आहे. हिंदी राष्ट्रभाषा असल्यामुळे आपण तिचा प्रसार, प्रचार केला पाहिजे, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे हिंदी अध्ययन मंडल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे अध्यक्ष डॉ. अनिल साळुंखे यांनी केले.'

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील हिंदी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी पंधरवडा समारोप कार्यक्रम तसेच राष्ट्रीय सेवा योजना दिन संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रो. डॉ. अनिल साळुंखे विद्यार्थिनींना मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी होते.

डॉ. साळुंखे म्हणाले की, 'हिंदी भाषेच्या प्रचार प्रसाराचे सर्वोत्कृष्ट माध्यम वृत्तपत्रे आणि दूरदर्शन आहे. त्यांची प्रगती म्हणजे हिंदीची प्रगती तिच्या प्रगतीसाठी नेहमीच प्रयत्नशील राहिले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन प्रा. रईसा पठाण यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. बताले यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शंकर राजे, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. धीरज राजगुरु, प्रा. निर्मला कर्रे उपस्थित होते.

म्युच्युअल फंडाविषयी आज मार्गदर्शन शिबीर

✔ सुराज्य/सोलापूर

जागतिक व राजकीय घडामोडीमुळे होणारे आर्थिक व इतर अनेक कारणांमुळे सतत शेअर मार्केटमधील चढउतार परिस्थिती आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील बदल, बँकेच्या मुदत ठेवीचे बदलते व्याजदर व गुंतवणुकीचे इतर उपलब्ध संधी याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शेअर बाजार व म्युच्युअल फंडाविषयी रविवार दि. १ ऑक्टोबर रोजी ठिक ६ वाजता लोटस, जुना गांधी नगर रोड, सोलापूर येथे वरुण फायनान्शियल सर्व्हिसेसच्यावतीने मार्गदर्शन शिबीर करण्यात येणार आहे, अशी माहिती एनआयएसएम सर्टिफाईड विजयकुमार अंकम यांनी दिली आहे.

सदरील कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थित संतोष शिरसीकर (अेएमएफआय, मुंबई) आहेत. तरी इच्छुक नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावे, असे आवाहन विजयकुमार अंकम यांनी केले.

बीएमआयटीत विद्यार्थी-पालक मेळावा

✔ सुराज्य/सोलापूर

बीएमआयटी महाविद्यालय, बेलाटी सोलापूर येथे पालक मेळावा खेळीमेळीच्या वातावरणात सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. जी. कुलकर्णी यांनी भूषवले होते.

सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सांस्कृतिक बौध्दिक विकास, गुणवत्ता पूर्ण शिक्षण यावर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांचे आरोग्य व विद्यार्थ्यांचे निकाल उंचाविण्याच्या दृष्टिकोनातून मान्यवरांनी तसेच शिक्षकांनी विचार व्यक्त केले. शिक्षक पालक व विद्यार्थी या त्रिकोणाला साधल्याशिवाय विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती होणार नाही, असा सूर सर्वच पालकांचा होता.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष आमदार दिलीप माने, उपाध्यक्ष पृथ्वीराज माने, सचिवा जयश्री माने, विश्वस्त स्नेहल माने, समूह संचालक प्रा. आर. वाय. माने यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी विभागप्रमुख प्रा. मगदूम, प्रा. झांबरे, प्रा. शिंपी, प्रा. पवार , प्रा पाटील, प्रा अडवाणी उपस्थित होते.

विवाहितेचा छळ पतीसह; चौघांवर गुन्हा

✔ **सुराज्य/सोलापूर :** लग्नात मानपान केला नाही, हुंडा दिला, नाही तू काळी आहे. आमच्या मुलाला शोभत नाही. तरीदेखील आम्ही तुला आमच्या मुलासोबत लग्न करून दिले. तु पांढऱ्या पायाची आहे, असे टोचून बोलून विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देऊन माहेरून दोन लाख रुपये घेऊन ये त्याशिवाय तुला नांदवणार नाही, अशी दमदाटी करून हाकलून दिल्याप्रकरणी पतीसह चार जणांविरुध्द जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ मे २०२३ ते १४ जुलै २०२३ दरम्यान घडली. याप्रकरणी निशा किरण रणधरे (वय-२१, रा. मड्डी वस्ती, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती किरण शिवानंद रणधरे, सासू गौराबाई राणधरे, दिर संदीप रणधरे, संतोष रणधरे (सर्व. रा.मु.पो.धोत्री) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पो.हे.कॉ. गायकवाड हे करीत आहेत.

आयशर वाहनाची कारला धडक

सोलापूर पुणे हायवे रोडवरील केगाव येथील हॉटेल जंगली येथे आयशर वाहनाने (क्र. एमएच.१३.सीयू.१८८५) गीतेश विजय पाटील (वय-३५, रा. हैदराबाद) हे चालवत असलेल्या कार क्र.टी.एस.१०.ई.जे.९३४६ या कारला पाठीमागून भरधाव वेगाने धडक दिली. यात साठ हजार रुपयांचे नुकसान केले आहे. ही घटना २९ सप्टेंबरला स. ८ च्या सुमारास हॉटेल जंगली येथे घडली. याप्रकरणी गीतेश पाटील यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून आयशर वाहन चालक यातील चालक समाधान महादेव दुधाळ (वय-३१, रा. मु.पो.तळसंगी, ता. मंगळवेढा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोहेकॉ घुगे हे करीत आहेत.

विश्रामगृहाची दुरावस्था; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

✔ सुराज्य/सोलापूर

शासकीय विश्रामगृह येथे भारतातील तसेच महाराष्ट्रातील अनेक व्हीव्हीआयपी, व्हीआपी, जज्, वरिष्ठ अधिकारी हे विविध कामांसाठी सोलापूर दौऱ्यावर येत असतात. ते सोलापूर शासकीय विश्रामगृह येथे मुक्काम करतात.

अनेकदा त्यांना विश्रामगृहातील कौलारु गळती, एएसी रिपेअरी, पंखे बंद चालू पडदे जुने, सोफासेट, बाथरुमची दुरावस्था, छतगळती, अस्वच्छता अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे सोलापूरचे नावलौकीक खराब होत आहे. सोलापूरची प्रतिमा यामुळे मलीन होताना दिसते. त्यामुळे सोलापुरातील विश्रामगृहाची लवकरात लवकर दुरुस्ती करण्याचे आदेश द्यावेत, अशा आशयाने निवेदन जी. एम. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे यांच्या आदेशान्वये जी. एम. संस्थेचे सल्लागार दत्ता शिंदे यांच्या हस्ते निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी जी. एम. संस्थेचे सभासद अझहर शेख, अजय कोळेकर, संतोष कदम, सोहेस शिरसे, यशपाल कांबळे, फिरोज शेख उपस्थित होते.

जे. पी. सोशलतर्फे हिजामा कॅम्प

✔ **सुराज्य/सोलापूर :** नई जिंदगी भागातील जे. पी. सोशल फाऊंडेशनच्यावतीने जश्ने ईद ए मिलादुन्नबीनिमित्त हिजामा कॅम्प आयोजित करण्यात आले होते.

कॅम्पचे उद्‌घाटन सय्यद मोहम्मद कामिल पाशा हुसैनी साहेब यांच्या हस्ते झाले तसेच प्रमुख मान्यवर म्हणून रुग्णसेवक बाबा मिस्त्री, भावी आमदार संतोष पवार, युथ प्राईड ग्रुपचे समीर शेख, पत्रकार दौला कुमठे, अय्याज भाई, रियाज सय्यद (जिल्हा अध्यक्ष ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन वाहतूक संघटना, सोलापूर), उमर नाईकवाडी, ॲड. सिराज शेख, हिजामा स्पेशालिस्ट डॉ. शकील अत्तार तसेच शहरातील विविध क्षेत्रात कार्य करणारे मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शविल्याबद्दल फाऊंडेशनचे अध्यक्ष जाफर पटेल यांनी सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन रियाज अत्तार यांनी केले.

कुमठ्यात आज जलयात्रा महोत्सव

✔ सुराज्य/सोलापूर

अतिशय क्षेत्र १००८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर समितीच्यावतीने पर्युषणपर्वाची सांगता समारंभ रविवारी १ ऑक्टोबर २०२३ रोजी जलयात्रा महोत्सवाचे आयोजन केले असून समाजातील सर्व श्रावक श्राविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील व सचिव वालचंद पाटील यांनी केले आहे. सकाळी ८ वाजता ध्वजारोहण, ९ वाजता भगवंतास अभिषेक व ९.३० वाजता १०८ मंगलकलश इंद्र इंद्रायणी व भगवंताच्या पालखीची भव्य मिरवणूक निघणार आहे.

यावेळी इंद्र इंद्रायणीचा मान महेश संजय पानपट, श्रध्दा महेश पानपट तसेच मिथुन धवल शहा, श्रध्दा मिथुन शहा यांना देण्यात आलेला आहे तर कलश वाटप व चांदीचा मानाचा कुंभ स्मिता नंदकुमार लोखंडे यांना देण्यात आला आहे तर पालखी उचलण्याचा मान नंदकुमार लोखंडे व राम पाटील यांना देण्यात आला आहे. यावेळी समाजातील पुरस्कार विजेत्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास माजी आमदार दिलीपराव माने, माजी नगरसेवक जयकुमार माने, सावरगाव जैन मंदिराचे संचालक डॉ. आदर्श मेहता, हृदयरोग तज्ञ डॉ. सिध्दांत गांधी, डॉ. प्रा. महावीरशास्त्री महिला मेडिकल कॉलेजचे अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे, प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक शशीकांत गांधी, संगवे उद्योजक, अनिल जमगे उद्योजक, जैन सैतवाळ, समाजाचे संचालक प्रदीप पांढरे, जैन सोशल ग्रुपचे हर्षल कोठारी, महावीर इंटरनॅशनलचे कल्पेश मालू, महावितरणचे उपअभियंता अमोल पांढरे, सुजाता धवल शहा यांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमास येणाऱ्या सर्व श्रावक-श्राविकांची भोजनाची व्यवस्था नंदकुमार लोखंडे यांनी केली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील हे शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते : ठाकरे

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात व्याख्यान कार्यक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

'खेड्यापाड्यातील शेतकरी, कष्टकरी बहुजन समाजात युगानुयुगे चालत आलेला निरक्षरतेचा अंधकार नाहीसा करून त्यांच्या जीवनात ज्ञानमयी, विद्येरुपी प्रकाश पोहोचविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे आधुनिक महाराष्ट्रातील शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचे गेल्या शतकभरापासून सुरु असलेले शैक्षणिक कार्य एकमेवाद्वितीय आहे, असे प्रतिपादन एलएचपीलिचे व्यवस्थापकीय संचालक शरदकृष्ण ठाकरे यांनी केले.

सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ उद्योजक केतन शहा होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, प्राचार्य मोहन खंडागळे, मुख्याध्यापिका निलीमा शिरसट आदी उपस्थित होते.

ठाकरे पुढे म्हणाले की, 'महापुरुषांच्या कार्याचे विस्मरण होता कामा नये. नव्या पिढीने महापुरुषांचा आदर्श समोर ठेवून वैयक्तिक विकास साधतानाच सामाजिक कार्यही हाती घ्यायला हवे. समाजात अजूनही अस्तित्वात असलेली सामाजिक, आर्थिक विषमता, गरीब आणि श्रीमंतात असलेली शैक्षणिक दरी दूर करण्यासाठी झटले पाहिजे.'

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना केतन शहा म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी समाजात वावरताना करुणाभाव जोपासावा. दीन-दुबळ्या, निराश्रित घटकांना जगण्याचे बळ आणि आधार द्यावा.'

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य प्रा. देवराव मुंडे यांनी करून दिला.

सूत्रसंचालन डॉ. इंदुमती चोळळे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. निलोफर तांबोळी यांनी केले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

महत्त्वाचे वृत्त...

जुन्नरमध्ये उभारणार छत्रपतींचे सुवर्णमंदिर

पुणे : हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य रयतेसाठी देणारे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी म्हणजे जुन्नर. याच शिवजन्मभूमीत छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंहसनधारी सुवर्ण मंदिर, महाराजांचा जगातील सर्वात उंच पुतळा आणि मागे स्वराज्याचा सर्वात उंच भगवा ध्वज उभारण्याची घोषणा माजी आमदार आणि शिवसेना जिल्हाध्यक्ष शरद सोनवणे यांनी केली आहे. जुन्नर शहरातील शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरीपासून ५ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या गोद्रे गावामध्ये २५ एकर क्षेत्रावर छत्रपती शिवाजी महाराजांचे सोन्याने मढवलेले सुवर्णमंदिर उभारण्यात येणार आहे. याच परिसरात शिवरायांचा जगातील सर्वात उंच २०० फुट उंचीचा पुतळा उभारण्यात येणार असून ८० मीटर उंचीचा स्वराज्याचा भगवा ध्वज देखील असणार अशी माहिती यावेळी शरद सोनवणे यांनी दिली.

मिरवणुकीत महिला पोलिसाचा विनयभंग

मुंबई : विक्रोळीमध्ये शुक्रवारी एका समाजाची धार्मिक मिरवणूक सुरू असताना त्यात सहभागी काही तरुणांनी एका महिला पोलिसांचा पाठलाग करून तिची छेड काढल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेची माहिती मिळताच काही राजकीय पक्षांच्या नेत्यांनी शनिवारी पार्कसाईट पोलीस ठण्याबाहेर आंदोलन केले. तसेच आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. शुक्रवारी रात्री १० च्या सुमारास मिरवणुकीतील काही तरुणांनी नातेवाईकाकडे जात असलेल्या महिला पोलीस शिपायाची छेड काढली. आरोपींनी काही अंतरापर्यंत या तरुणीचा पाठलागही केला. मात्र, पीडित तरुणीने पळ काढून पार्कसाईट पोलीस ठाणे गाठले. घडलेला प्रकार येथील पोलिसांना सांगितल्यानंतर पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

नऊ महिन्यात कर्जभार ६७ कोटींवर

मुंबई : चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत (ऑक्टोबर ते डिसेंबर) रोखे बाजारातून २२ हजार कोटींचे कर्ज घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षातील कर्जाची रक्कम ६७ हजार कोटींवर गेली आहे. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत राज्यावरील कर्जभार यंदा आणखी वाढण्याची शक्यता आहे. चालू आर्थिक वर्षाच्या तिमाहीत राज्यांकडून घेतल्या जाणाऱ्या कर्जाची आकडेवारी रिझर्व्ह बँकेने जाहीर केली आहे. या तिमाहीत विविध राज्यांकडून एकूण २ लाख ३७ हजार कोटींचे कर्ज रोखे बाजारातून उभे करण्यात येणार आहे.

धायरीत तीन कारखान्यांना भीषण आग

पुणे : सिंहगड रस्त्यावरील धायरी भागात तीन कारखान्यांना शनिवारी दुपारी आग लागली. आगीत कारखान्यातील साहित्य, कच्चा माल जळला. कारखान्याला सुट्टी असल्याने गंभीर दुर्घटना टळली. धायरीतील औद्योगिक वसाहत लघुउद्योग आहेत. या भागात गाड्यांच्या बॅटरीचा कारखाना, सुटे भाग तयार करण्याचा कारखाना आहे. पुणे अग्निशमन दलाचे आठ बंब आणि टँकर घटनास्थळी दाखल झाले. आग भडकल्याने पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचा बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करुन तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत कारखान्यातील कच्चा माल, साहित्य जळाले.

वीस लाखांचे पाच कोटी करण्याचे आमिष

पुणे : वीस लाख रुपयांचे पाच कोटी रुपये करण्याच्या आमिषाने एका भोंदूने व्यावसायिकाची २० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भोंदूसह साथीदारांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी तन्वीर शामकांत पाटील, शिवम गुरुजी, सुनील राठोड, आनंदस्वामी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मदतीच्या बहाण्याने तरुणीवर बलात्कार

पुणे : विमाननगर भागात एका उपाहारगृहात पार्टी करुन घरी नियालेल्या तरुणीला घरी सोडण्याचा बहाणा करुन तिच्यावर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दत्तात्रय खरात (वय २८, रा. विमाननगर) याला अटक केली आहे. याबाबत एका ३२ वर्षीय तरुणीने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विमाननगर भागात बॅकयार्ड कॅफे आहे. तरुणी, तिची मैत्रीण, दोन मित्र गुरुवारी रात्री पार्टी करण्यासाठी तेथे गेले होते. उपहारगृहात दहा हजार रुपयांचे बील झाले. तरुणीने डेबिट कार्डद्वारे बील अदा करण्याचा प्रयत्न केला. मात्र, डेबिट कार्डच्या सांकेतिक शब्दात चूक झाल्याने बिल अदा होऊ शकले नाही. नंतर बील भरल्यानंतर तरुणी उपाहारगृहात थांबली. त्यावेळी उपहारगृहातील एका ग्राहक तरुणाने तरुणीला मदत करण्याचा बहाणा केला. तरुणीला घरी सोडण्याचा बहाणा करुन खराडी भागातील एका हॉटेलमध्ये नेऊन तरुणीवर त्याने बलात्कार केला.

तीन महिलांनी एका व्यावसायिकेला लुटले

कल्याण : शोभेचे दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने दुकानात येऊन एका महिला व्यावसायिकाला तीन भुरट्या महिलांनी एक लाख २३ हजाराला लुटले. खरेदीदार महिला दुकानातून निघून गेल्यावर व्यावसायिक महिलेच्या हा चोरीचा प्रकार निदर्शनास आला. कल्याण पूर्वेतील शिवाजीनगर कोळसेवाडी भागातील प्राजक्ता कॉस्मेटिक या दुकानात गेल्या दोन आठवड्यापूर्वी दुपारच्या वेळेत हा प्रकार घडला. एक ४५ वर्ष, एक १३ वर्ष आणि एक चार वर्षाची मुलगी अशी आरोपी महिलांची ओळख आहे. प्राजक्ता अभिषेक पवार असे तक्रारदार महिलेचे नाव आहे. हवालदार एम. एस. जाधव या प्रकरणाचा तपास करत आहेत.

नाशिकमध्ये प्रगतिशील साहित्य संमेलनाची तयारी

नाशिक : नाशिक जिल्हा प्रगतिशील साहित्य संमेलन ८ ऑक्टोबर रोजी येथील व्ही. एन. नाईक समाज संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. संमेलनास अध्यक्ष म्हणून तुकाराम चौधरी तर स्वागताध्यक्ष म्हणून राजू देसले यांची निवड झाली आहे. संमेलनस्थळाला बाबूराव बागूल साहित्यनगरी हे नाव देण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन राष्ट्रीय पुरस्कार विजेते तारपा वादक भिकल्या धिंडा यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकचे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवाळ, वित्त व लेखाचे सहसंचालक माधव थैल, साहित्यिक संजय दोबाडे, कचरू भालेराव उपस्थित राहणार आहेत.

वंदेभारतमधील प्रवाशांनी घेतला मोदकाचा आस्वाद

मुंबई : मध्य आणि पश्चिम रेल्वेवर धावणाऱ्या चार वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये गणेशोत्सवानिमित्त इंडियन रेल्वे केटरिंग ॲण्ड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) कडून प्रवाशांना मोदक देण्यात आले. यावेळी 'वंदे भारत' मधील सुमारे दोन हजार प्रवाशांनी मोदकांचा आस्वाद घेतला. मध्य रेल्वेवरून सीएसएमटी-शिर्डी, सीएसएमटी-सोलापूर, सीएसएमटी-मडगाव आणि पश्चिम रेल्वेवरून मुंबई सेंट्रल-गांधीधाम या चार 'वंदे भारत' मध्ये नियोजित जेवणात मोदक देखील ठेवले होते.

पुणे शहर हादरले

निवृत्त पोलिसाच्या मुलाचा भर रस्त्यात खून

सुराज्य/पुणे

विसर्जन मिरवणुकीनंतर पुण्यात हत्येचा थरार घडला. सेवानिवृत्त पोलिसाचा मुलगा आणि अनेक नेत्यांच्या ओळखीचा असलेल्या विजय ढुमे यांची बांधकामाच्या लोखंडी सळई आणि भरीव लाकडी दांडक्याने डोक्यात मारहाण करून हत्या करण्यात आली. सिंहगड रोडवर हा हत्येचा थरार घडला. पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडल्यानंतर सायंकाळी सिंहगड रस्त्यावर ही खळबळजनक घटना घडली. विजय ढुमे हे सेवानिवृत्त पोलिसांचा मुलगा असून त्याचे अनेक बड्या पोलीस अधिकाऱ्यांशी मैत्रीचे संबंध होते आणि अनेक राजकारणी व्यक्तींशी त्यांचे चांगले संबंध होते.



क्वॉलिटी लॉजमधून खाली उतरल्यानंतर बाहेर पडत असताना चार ते पाच हल्लेखोरांनी विजय ढुमे यांच्यावर अचानकपणे हल्ला केला. हा सगळा थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. या घटनेमुळे सध्या पुणे शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

अनेकांच्या मनात धडकी...

पुण्यात गुन्हेगारीचं प्रमाण वाढत असल्याचं दिसत आहे. कोयता गँग आणि क्षुल्लक वादातून या घटना पुढे येतात. मात्र, या घटनेमुळे पुणे शहरात भीतीचं वातावरण निर्माण होतं. कोयता गँगचे हल्ले संपायचं नाव येत नाही आहे. त्यात अशा घटना पुढे आल्याने पोलिसांवरचा देखील ताण वाढतो. पुणे पोलिसांनी पुण्यात गुन्हेगारी थांबवण्यासाठी अनेक उपाययोजना राबवल्या आहेत. मात्र, तरीही या गुन्हेगारीला आळा बसत नसल्याचं चित्र आहे. भररस्त्यात होणाऱ्या या प्रकारामुळे अनेकांच्या मनात धडकी भरली आहे.

पुण्यात भररस्त्यातील थरार संपेना

काहीच दिवसांपूर्वी पुण्यात चाकूने वार करत तरुणाची दहा ते बारा जणांनी मिळून हत्या केल्याची धक्कादायक घटना होती. ही घटना पुण्यातील मंगला टॉकीज परिसरात रात्री एक वाजताच्या सुमारास घडली होती. चित्रपट पाहून बाहेर पडताना या तरुणावर वार करण्यात आले होते. नितीन मस्के असं हत्या करण्यात आलेल्या मुलाचं नाव होतं. नितीन चित्रपट गृहातून बाहेर पडला. त्यावेळी त्याच्यावर चाकूने वार करण्यात आले होते. यामध्ये नितीन मस्के याचा जागीच मृत्यू झाला. तलवार, चाकू आणि लोखंडी रॉड अशी हत्यारे घेऊन दहा ते बारा जणांनी घेरून मस्के यांची हत्या केली होती.

रोहन बोपण्णाची सुवर्ण कामगिरी

ऋतुजासोबत मिश्र दुहेरीत बनला चॅम्पियन

सुराज्य/नवी दिल्ली

भारताचा अनुभवी टेनिसपटू रोहन बोपण्णा याने आशियाई क्रीडा स्पर्धेत आश्चर्यकारक कामगिरी केली आह. त्याने वयाच्या ४३ व्या वर्षी भारतासाठी सुवर्णपदक जिंकले आहे. बोपण्णा शनिवारी (३० सप्टेंबर) मराठमोळ्या ऋतुजा भोसलेसह आशियाई क्रीडा स्पर्धेच्या मिश्र दुहेरीत चॅम्पियन ठरला आहे. या दोन्ही टेनिसपटूंनी चायनीज तैपेईच्या त्सुंग हाओ आणि अन शुओ यांचा २-६, ६-३ (१०-४) असा पराभव करून अंतिम फेरीत विजय मिळवला आहे.

बोपण्णा आणि ऋतुजा यांची सामन्यात खराब सुरूवात झाली. दोयांनी पहिला सेट २-६ ने गमावला. मात्र, त्यानंतर दोयांनी जोरदार पुनरागमन करताना दुसरा सेट ६-३ ने जिंकला. यानंतर दुसऱ्या सेटमध्ये सुपर टायब्रेक झाला. यामध्ये बोपण्णा आणि ऋतुजाने १०-४ असा विजय मिळवला. यापूर्वी रामकुमार रामनाथन आणि साकेथ मायनेनी या जोडीने पुरुष दुहेरीत रौप्यपदक जिंकले होते.

दोन हजार रुपयाच्या नोटा बदलण्याची मुदत वाढवली

सुराज्य/मुंबई

दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्याची मुदत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने वाढवली आहे. उद्यापासून २००० रुपयांच्या नोटा व्यवहारात वापरता येणार नाहीत. बँकेत नोटा जमा करण्याची मुदत आरबीआयने वाढवली आहे. शनिवारी रिझर्व्ह बँकेने परिपत्रक काढत ही माहिती दिली आहे. आता, नागरिकांना त्यांच्याकडील दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्यासाठी आणखी सात दिवसांची मुदत मिळाली आहे.

आरबीआयने दिलेल्यामाहितीनुसार, ज्यांनी अजूनही २००० रुपयांच्या नोटा बदलल्या नसतील त्यांना आता ७ ऑक्टोबरपर्यंत नोटा बदलता येणार आहे. एकाच वेळी कमाल २० हजार रुपयांच्या नोटा बदलता येणार असल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे.

कोविड घोटाळा प्रकरणी ईडीचे आरोपपत्र दाखल

सुराज्य/मुंबई

कथित कोविड घोटाळ्याप्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली आहे. अंमलबजावणी संचालनालयानं (ईडी) कोविड घोटाळ्याबाबत आरोपपत्र दाखल केलं आहे. ईडीने जंबो कोविड सेंटर कथित घोटाळा प्रकरणात मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) विशेष न्यायालयात ७५ पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे.

आरोपपत्रात लाइफ लाईन हॉस्पिटल आणि मॅनेजमेंट सर्व्हिसेसचे भागीदार सुजित पाटकर आणि दहिसर जंबो सुविधेचे डीन डॉ. किशोर बिसुरे याना आरोपी करण्यात आले आहेत. घोटाळ्यातून मिळणाऱ्या रकमेतून सोन्याची बिस्किटं खरेदी करण्यात आली. तसेच ही बिस्किटं लाचेच्या स्वरूपात मुंबई महापालिकेतील अधिकाऱ्यांना दिल्याचा आरोप ईडीच्या आरोपपत्रात करण्यात आला आहे. ईडीनं लाईफलाइन हॉस्पिटल मॅनेजमेंट सर्व्हिसेसचे भागीदार सुजीत पाटकरांसह हेमंत गुप्ता, संजय शाह आणि राजीव साळुंखे यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केलं आहे. आरोपपत्रात मुंबई महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. किशोर बिसुरे, डॉ. अरविंद सिंग, दहिसर जंबो कोविड सेंटरचे डीन यांचाही समावेश आहे.

कुणालाही धक्का न लावता आरक्षण देऊ : मुख्यमंत्री

सुराज्य/मुंबई

इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका आहे. इतर मागास समाजाचे महामंडळ, सारथी, बार्टी, महाज्योती, टीआरटीआय या संस्थांना निधी वाटपात सुसुत्रता आणतानाच सर्व समाज घटकांना समप्रमाणात न्याय देण्यात येईल, केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेची सांगड घालत राज्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी करून बारा बलुतेदारांना लाभ मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी दिली.

सह्याद्री अतिथीगृह येथे इतर मागास वर्ग तसेच भटके-विमुक्त समाजातील विविध संघटनांसमवेत मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार रामदास तडस, आमदार डॉ. संजय कुटे, परिणय फुके, गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, मुख्य सचिव मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनीधी उपस्थित होते. सुमारे तीन चास चाललेल्या बैठकीत इतर मागासवर्ग, भटके-विमुक्त, बारा बलुतेदार आदी समाजाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी आपले म्हणणे मांडले. कुठल्याही समाजाचे आरक्षण कमी करण्याची शासनाची भूमिका नाही, असे स्पष्ट करीत मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, मराठा समाजाचे रद्द झालेले आरक्षण पुन्हा मिळवून देताना इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. जुन्या कुणबी नोंदी असलेल्यांना कुणबी दाखले देण्यासंदर्भात निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यवाही सुरू आहे. राज्य शासन इतर मागास, भटक्या विमुक्त समाजाच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.

छ. शिवरायांची वाघनखे केवळ तीन वर्षांसाठी महाराष्ट्रात

सुराज्य/मुंबई

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाला ठार मारण्यासाठी वापरलेली वाघनखं महाराष्ट्र सरकारला मिळणार आहेत. व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयाकडून तीन वर्षांसाठी कर्जावर ही वाघ नखं दिली जाणार आहेत, असे सांस्कृतिक कार्य विभागाने या आठवड्यात जारी केलेल्या जीआरमध्ये म्हटले आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय, सातारा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय, नागपुरातील मध्यवर्ती संग्रहालय आणि कोल्हापुरातील लक्ष्मी विलास पॅलेस या चार संग्रहालयात हे मौल्यवान शस्त्रं सामान्य नागरिकांना पाहण्यासाठी ठेवली जातील, असे सरकारने म्हटले आहे.

लंडनमधून वाघनखं परत आणण्याबाबत सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्यासाठी राज्य सरकारने ११ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. ही समिती वाघनखांचे प्रदर्शन आणि राज्यातील सार्वजनिक कार्यक्रमांच्या योजनांना अंतिम रूप देईल. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वाघ नखं नोव्हेंबर महिन्यात मुंबईत आणणार असल्याचे सांगितले होते.

मुनगंटीवार युनायटेड किंगडमला भेट देतील आणि ३ ऑक्टोबर रोजी व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमसह सामंजस्य करारावर स्वाक्षरी करतील. सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेसुध्दा लंडनला जाणार असल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितले होते, परंतु शिंदे यांनी नुकताच आपला आठवडाभराचा यूके आणि जर्मनी दौरा रद्द केला.

यूकेतील संग्रहालयाशी करार

राज्यातील २५० आश्रमशाळा होणार आदर्श

पुस्तकी ज्ञानाच्या पलिकडे जाऊन शिकवण्याचे नियोजन

सुराज्य/पुणे

राज्यातील २५० आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळांचा दर्जा देण्यात आला आहे. या अंतर्गत निवड केलेल्या आश्रमशाळांमध्ये सुसज्ज इमारत, वसतिगृह, भोजनालय, क्रीडांगणासह अद्ययावत शैक्षणिक सुविधा देण्यासह विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन शिकवण्याचे नियोजन आहे.

आदिवासी विकास विभागाअंतर्गत २९७ आश्रमशाळा आहेत. आधुनिक काळातील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी या शाळांमध्ये आमूलाग्र बदल आवश्यक असल्याने २५० आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा करण्याचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागाच्या आयुक्तांनी दिला होता. त्यानुसार अनुषंगाने २५० आश्रम शाळांना आदर्श आश्रमशाळा म्हणून घोषित करण्याबाबतचा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाने प्रसिद्ध केला आहे.

या निर्णयानुसार शैक्षणिक आणि भौतिक सुविधा पुरवण्यासाठी आदिवासी विकास विभागाचे आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नेमणूक करण्यात आली.

वनिर्मितीला चालना देणारे, वैज्ञानिक प्रवृत्ती, संविधानिक मूल्ये, संभाषण कौशल्य अशी कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित केली जातील. विद्यार्थ्यांची मातृभाषा आणि इंग्रजी यांत समन्वय साधून कृतियुक्त शिक्षण यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

सर्व सुविधांचा समावेश

आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्यासाठी विविध भौतिक सुविधा निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यात सुसज्ज शालेय इमारत, माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगीत आणि कला कक्ष, स्वच्छतागृहे, वसतिगृहे, शिक्षक-कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, भोजनालय, क्रीडांगण आणि क्रीडा साहित्य, वर्गखोल्या, सीसीटीव्ही कॅमेरे, डिजिटल वर्गखोल्या, टॅब लॅब, संगणक प्रयोगशाळा अशा सुविधांचा समावेश आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

वाहने ८, चार दिवस जप्त दारू लिटर २ हजार

सुराज्य/सोलापूर

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू निर्मिती, विक्री व वाहतूकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने हातभट्टी दारुची वाहतूक करणाऱ्या सात मोटरसायकलींसह दीड हजार लिटर हातभट्टी दारू जप्त केली आहे. शुक्रवारी राज्य उत्पादन शुल्क विभागाने एका चारचाकीसह ७५० लिटर हातभट्टी दारू जप्त केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक- अ विभाग व भरारी पथकाने अवैध हातभट्टी दारू वाहतूक विरोधात संयुक्त मोहीम राबवून मंगळवारी पहाटेच्या सुमारास हातभट्टी दारू निर्मिती

ठिकाणांवरून सोलापूर शहरात दारूचा पुरवठा करणाऱ्या सात दुचाकी पकडल्या आहेत. भरारी पथकाने दोड्डी ते कुंभारी रोडवर सुभाष बालू पवार (रा. दोड्डी तांडा) यास रबरी ट्यूबमधून २४० लिटर व आदेश सोमनाथ चव्हाण (रा. मुळेगाव तांडा) यास दोन रबरी ट्यूबमधून १६० लिटर हातभट्टी दारू वाहतूक करताना ताब्यात घेतले. तसेच हैदराबाद रोडवर रमेश टिक्कू राठोड (रा. मुळेगाव तांडा) याला २४० लिटर हातभट्टी दारुची वाहतूक करताना पकडले.

राज्य उत्पादन शुल्क अ विभागाच्या पथकाने अक्कलकोट रोडवर पाळत ठेवून गोविंद बाबू चव्हाण व सागर सुभाष माने या दोघांना ४२० लिटर हातभट्टी वाहतूक करताना पकडले. तसेच संत तुकाराम चौक ते गुरुनानक चौक रोडवर २०० लिटर हातभट्टी दारू जप्त केली. दुचाकीस्वार दुचाकी जागेवरच टाकून पळून गेला. मल्लिकार्जुन नगर ते अक्कलकोट रोड पुलाखाली २४० लिटर हातभट्टी दारुसह दुचाकी पकडली. या गुन्ह्यातील आरोपी फरार असून त्याचा शोध सुरु आहे. अशाप्रकारे एकाच दिवशी तब्बल चार लाख ७५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यांनी केली कारवाई

ही कारवाई अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी उपअधीक्षक सूरज कुसळे, निरीक्षक राहुल बांगर, सुनील कदम, दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ, सुरेश झगडे, शिवकुमार कांबळे, सहायक दुय्यम निरीक्षक अलीम शेख, जवान किरण खंदारे, शोएब बेगमपुरे, चेतन व्हनगुंटी, अशोक माळी, नंदकुमार वेळापुरे, अण्णा कर्चे व वाहनचालक दीपक वाघमारे यांच्या पथकाने पार पाडली.

मतदार संघातील पाच हजार भाविकांना मोफत तुळजापूर यात्रा घडवणार

आ. बबनदादा शिंदे यांचा संकल्प

सुराज्य/टेंभुर्णी

माढा विधानसभा मतदारसंघातील पाच ते सहा हजार 'आराधी' भाविकांना कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे, मोफत एसटी प्रवासाने दर्शन घडवून आणण्याचा संकल्प आ. बबनदादा शिंदे व त्यांच्या पत्नी सौ सुनंदा बबनराव शिंदे यांनी केला आहे.

ज्या घरात तुळजाभवानी मातेची 'परडी,पोत व कवड्यांची माळ' असेल त्याच घरातील प्रमुख स्त्री किंवा पुरुष आराधी व्यक्तीस या मोफत तुळजापूर यात्रेचा लाभ घेता येणार आहे. पहिल्या ट्रिप मध्ये बारा गावातील सातशे आराधी भाविकांना १४ एसटी बस गाड्यातून २९ सप्टेंबर रोजी, पौर्णिमेच्या दिवशी तुळजापूरला जगदंबामातेच्या दर्शनाचा लाभ मिळाला. यामध्ये ६५० महिला व ५० पुरुष आराधी भावीकांचा समावेश होता. शनिवार दिनांक ३० सप्टेंबर पासून पितृपक्ष (महाळ) पंधरवाडा सुरू होत असल्यामुळे या यापुढे अश्विन महिन्यात १५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या , घटस्थापनेनंतर ,मतदार संघातील उर्वरित गावातील आराधी भाविकांना मोफत तुळजापूर यात्रा व भवानी मातेच्या दर्शनाचा निश्चित लाभ मिळणार आहे व याचे नियोजन गावोगावी कळवण्यात येईल असे शेती खात्यातील अधिकारी बाबासाहेब मुलाणी यांनी सांगितले .

सलग सुट्ट्यामुळे वटवृक्ष मंदिरात भाविकांची गर्दी

अक्कलकोट : येथील श्री वटवृक्ष स्वामी मंदिरात पोर्णिमा व सलग सुट्यामुळे भाविकांनी स्वामींच्या दर्शनाकरिता अलोट गर्दी केली. अनंत चतुर्दशी, ईद ए मिलाद, शनिवार, रविवार, व महात्मा गांधी जयंती यांच्या सलग सुट्टयामुळे भाविकांची प्रचंड गर्दी अक्कलकोट तीर्थक्षेत्री झाली. रात्री उशिरापर्यंत भाविकांची दर्शन रांग चौकापर्यंत गेली होती. तसेच पोर्णिमा असल्याने भाविक दर्शनासाठी गर्दी करत आहेत. दर्शनरांग पहिल्यांदाच पोर्णिमेव्यतिरिक्त फत्तेसिंह चौकापर्यंत गेली होती. अनेक स्वामी भक्तांनी आज श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन धन्य झाले. अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की जय या जयघोषाने वटवृक्ष मंदिर परिसर व अक्कलकोट नगरी दुमदुमली. अजुनही दोन दिवस सुट्टी असल्याने पोलीस, मंदिर प्रशासन व नगरपालिकेला नियोजन करावे लागणार आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत खंडाळी जि. प. शाळेत कार्यक्रम

वेळापूर : महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या दरम्यान खंडाळी जि.प. शाळेमध्ये स्वच्छता पंधरवडा मोहीम अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छता ही सेवा दैनंदिन उपक्रमांतर्गत घोषवाक्य व पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी श्रमदान मोहिमेचे आयोजन करण्यात आले. शाळेमध्ये प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले. २६ सप्टेंबर रोजी अमृत कलश चे पूजन करून पंचप्राण शपथ, स्वच्छता शपथ व माझी वसुंधरा शपथ घेण्यात आली. त्यानंतर खंडाळीमधील श्रीकाशी विश्वेश्वराचे मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला. पर्यावरणावर आधारित चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. ३० सप्टेंबर रोजी एक दिवस माझ्या गावातील स्वच्छतेसाठी अंतर्गत संपूर्ण खंडाळी मधील सर्व शासकीय कार्यालय स्वच्छ करण्यात आली तसेच स्वच्छता मॉनिटर यांचा गुणगौरव करण्यात आला.

अक्कलकोट येथे ईद ए मिलाद उत्साहात साजरी

अक्कलकोट : अक्कलकोट शहरात ईद ए मिलाद उत्साहात साजरी करण्यात आली.या वेळी माणिक पेठ जमत (सिरत कमिटी अक्कलकोट) कडुन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने अक्कलकोट शहरात भव्य जुलूस(रॅली)काढण्यात आली .सदर रॅली माणिक पेठ ईदगहा येथुन निघुन, कारंजा चौक, आरिफ शेरीकर,चौक सावरकर,चौक सेंट्रल चौक, फतेसिंग चौक,नाईकवाड गल्ली, रजिअल्लाह टेक,ए वन चौक,बस स्टॅन्ड,हन्नूर चौक,बुधवार पेठ येथुन फिरुन माणिक पेठ ईदगहा येथे शेवट करण्यात आला. यावेळी माणिक पेठ ईदगहा येथै दुवा दाता पीर साहब यांच्या हस्ते करण्यात आली.

कुंभारीतील गणेशोत्सव विकास पर्व ठरावा : जिल्हाधिकारी

सुराज्य/अक्कलकोट

स्वातंत्र्य चळवळीसाठी महाराष्ट्रामध्ये गणेशोत्सवाची सुरुवात झाली. त्यातून अनेक विधायक कामे होत आहेत. ही बाब कौतुकास्पद असून भविष्यात गणेशोत्सव हा विकास पर्व ठरावा, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केली.

कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील गोल कट्टा येथील अमृत

महोत्सवी जय हनुमान गणेशोत्सव तरुण मंडळाच्या उपक्रमाची पाहणी व गणेश पूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, सरपंच श्रुती सुभाष निकंबे, गजानन होनराव, गणेश मंडळाचे अध्यक्ष सुनील वाले, बिपिन करजोळे, शिरीष पाटील, अमर जवळे, अण्णाराव बाराचारे, अशोक करजोळे, श्रीकांत वाले, केदार वाले, लिंगराज वाले, चन्नवीर कटारे, नागराज कोंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी जिल्हाधिकारी, वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांचे स्वागत पारंपारिक वाद्याने करण्यात आले. पारंपारिक नऊवारी साडी, नथ परिधान केलेल्या महिला भगिनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होत्या.

पोलीस अधीक्षकामुळे योग जुळाला

उपक्रमशील मंडळाची माहिती घेत असताना पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांना कुंभारीच्या गणेश मंडळाची माहिती मिळाली. त्यानंतर वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी मंडळाच्या सामाजिक उपक्रमाची माहिती योगदानाचा लेखाजोखा पोलीस अधीक्षकांना देताच जिल्हाधिकारी प्रभावित होऊन या मंडळाला भेट दिली आणि मंडळाचे कौतुक केले.

तैरा मैल येथे धनगर समाजाचे सोमवारी रास्ता रोको आंदोलन

सुराज्य/सोलापूर

धनगर समाज एसटी आरक्षण संघर्ष कृती समितीच्या वतीने सोमवार दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता दक्षिण तालुक्यातील बसव नगर येथील १३ मैल येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

गेल्या ७० वर्षांपासून धनगर समाजाला एसटी आरक्षणापासून दूर ठेवण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून धनगर समाजबांधव मोर्चे, उपोषण याद्वारे सरकारकडे आरक्षणाची मागणी करीत आहे. पण याचा शासनस्तरावर कुठलाही विचार होत नाही. चौंडी येथे धनगर समाजबांधवांनी २१ दिवस उपोषण केल्यानंतर मंत्री गिरीष महाजन यांनी आश्वासन देऊन हे उपोषण सोडविले. परंतु या आश्वासनाची शासनस्तरावर कुठलीच फलनिष्पत्ती झाली नाही. त्यामुळे धनगर समाजाला एसटी आरक्षण तातडीने मिळावे, या प्रमुख मागणीसाठी हे रास्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात धनगर समाजाबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

श्रध्दा फलमारी हिचा स्केटिंगमध्ये विश्वविक्रम

सुराज्य/सोलापूर

वीरतपस्वी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या श्रध्दा फलमारी हिने नॉन स्टॉप एक तास स्केटिंग करुन वाय फाऊंडर सीईओ इंटरनॅशनल बुक ऑफ रेकार्ड, दिल्ली यांच्याकडून मानांकन व मेडेल मिळविले. यापूर्वी श्रध्दा हिने अडीच तासात स्केटिंग करुन सोलापूर ते तुळजापूर हा पल्ला गाठला आहे. तिला प्रशालेतील शिक्षक मुदगलव प्रशिक्षक राजेंद्र नारायणकर, आई-वडील, भाऊ रघुवीर फलमारी यांचे मार्गदर्शन लाभले.

सोमवारी स्वामी नरेंद्राचार्य यांचा पादुका दर्शन सोहळा

सुराज्य/सोलापूर

अनंत श्री विभुषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज (नाणीजधाम) यांचा पादुका दर्शन सोहळा सोमवार दि. २ ऑक्टोबर रोजी कुर्डूवाडी, मार्केड यार्ड येथे आयोति करण्यात आला आहे.

त्यापूर्वी स्वामी नरेंद्राचार्य यांच्या पादुकांची सकाळी ९ वाजता शहरात मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर पादुकांचे संतपीठावर आगमन होणार आहे. यानिमित्ताने निराधार व गरीब ११ महिलांना पिठाची चक्की वाटप करण्यात येणार आहे. गुरुपूजन, आरतीपूजन, प्रवचन, उपासक दिक्षा, दर्शन, पुष्पवृष्टी

असे कार्यक्रम दिवसभर होणार आहेत. यानिमित्ताने भाविकांना महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. याचा भाविकांनी लाभ घ्यावा, अस आवाहन स्वरुप सांप्रदाय सोलापूर जिल्हा सेवा समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे. जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. याशिवय संस्थानच्या वतीने कोविड काळात राज्य शासनाला ५० लाख रुपये, पंतप्रधान सहाय्यता निधीसाठी ५२ लाख रुपये, रत्नागिरी जिल्हा प्रशासनाला २५ लाख रुपये अशी आर्थिक मदत करण्यात आली आहे. संस्थानच्या वतीने राज्यात ४२ रुग्णवाहिका चालविल्या जातात. त्याचा गोरगरिब रुग्णांना फायदा होत आहे. संस्थानच्या वतीने आजवर १७ हजार ७२० बाटल्या रक्त संकलित करुन ते गोरगरिब रुग्णांना देण्यात आले. असे विविध उपक्रम संस्थानच्या वतीने राबविले जात असल्याचे जिल्हा स्वरुप सांप्रदायच्या वतीने सांगण्यात आले.

संत निरंकारी फौंडेशनतर्फे आज स्वच्छता अभियान

सुराज्य/सोलापूर

संत निरंकारी चॅरिटेबल ट्रस्ट फौंडेशनच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून रविवार दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत सोलापूर रेल्वेस्थानकावर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्व भाविक-भक्त व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन रेल्वे विभागाचे वरिष्ठ मंडल सुरक्षा अधिकारी व संत निरंकारी फौंडेशनचे तुकाराम क्षीरसागर यांनी केले आहे.

सांगोला शहर तालुक्यात गणरायाला निरोप

सुराज्य/सांगोला

गणपती बाप्पा मोरया , पुढल्या वर्षी लवकर या च्या जयघोषात श्रीगणेशा सांगोल्यावर आलेले दुष्काळाचे संकट दूर होऊ दे , भरपूर पाऊस पडू दे अशी मागणी करत सांगोला शहर व तालुक्या गणेश विसर्जन मिरवणुका कोणत्याही अनुचित प्रकाराविना शांततेत पार पडला

यंदा पोलीस प्रशासनाच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन सांगोला शहर व तालुक्यात ९ गावात एक गाव एक गणपती ' ही संकल्पना राबवली तर २६४ सार्वजनिक गणेश मंडळाने ५ फुटापासून ते २० फुटापर्यंत विघ्नहर्ता गणरायाच्या विविध आकार रूपातील आकर्षक मुर्त्यांच्या प्रतिष्ठापना केल्या होत्या. पोलीस प्रशासन व गणेश मंडळाच्या नियोजनानुसार सार्वजनिक गणेश मंडळांनी पाचव्या, सातव्या दिवसापासूनच गणेश विसर्जन मिरवणुका निघाल्या होत्या मात्र गुरुवारी अनंत चतुर्थीदिवशी सांगोला शहरातील बहुतांशी सार्वजनिक गणेश मंडळांनी ढोल, ताशा, हलगी बँड वाद्य वाजवित गुलाल केशरी रंगाची उधळण ,फटाके फोडून जल्लोषात मिरवणुका काढल्या. मिरवणुकी दरम्यान पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवला होता

पैगंबर जयंतीनिमित्त कुर्डूवाडीत मोटरसायकल रॅली

सुराज्य/कुर्डूवाडी

जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी अर्थात हजरत मोहम्मद पैगंबर जयंती कुर्डुवाडी शहर व परिसरात ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाईचे शामियाने उभे करुन मोठ्या उत्साहात शहरातून मोटार सायकल रॅली काढण्यात आली.यावेळी ठिकठिकाणी सरबत वाटप करण्यात आले. अनंत चतुर्दशी व हजरत महंमद पैगंबर जयंती एकाच दिवशी शुक्रवारी आल्याने मुस्लिम समाजाने शुक्रवारी जयंती साजरी न करता शनिवारी साजरी करण्याचा निर्णय घेतला.

बार्शी रोड येथून मोटारसायकल रैलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीची सुरुवात शहरातील मशिदिचे मौलाना यांच्या हस्ते करण्यात आली. मुस्लिम समाजाच्यावतीने भोजनाची सोय करण्यात आली होती.

संध्याकाळी ठिक ६वाजता गुलशन ए रजा मस्जिद महात्मा फुले नगर येथून जुलूस काढण्यात आला. जुलूस मध्ये उपस्थित लोक प्रेशीत मोहम्मद पैगंबर यांच्या नावाने जयघोष करीत होते. जुलूस शहरातील सर्व भागात फिरून गांधी चौक येथे फातेहाखानी करून समाप्त करण्यात आला. या रॅलीमध्ये हाफिज मौला मदारी, हाफिज कुर्बान आली, हाफिज अब्दुल गनी पठान, हाफिज मोहम्मद फजले रजा नुरी हे पुढे होते , त्याचप्रमाणे

कुर्डूवाडी चे माजी नगराध्यक्ष समिरभाई मुलानी, अय्युब मुलानी स, वसिम मुलानी, अर्शद मुलानी , कुस्ती सम्राट अस्लम काझी , राजु पठान, समद मुलानी ,कय्युमभाई मुलाणी, बागवान जमात अध्यक्ष बाबा बागवान, वलीमोहम्मद मुलानी, वाजिद भाई कुरेशी,वाहेदभाई शेख, नासर दाळवाले,किफायत शेख,जमिरशेठ मुलानी, हाजी शिराज शेख ,ईब्नूस नबूचॉद शेख, डॉ मोहसिन मकनू, नौसरशेख, जुम्मा शेख ,कमाल शेख, रफिक कोरबू, शकिलभाई तांबोळी यासीन शेख तसेच कुर्डुवाडी शहरातील बागवान जमात चे सर्व सदस्य,कुरेशी,दाळव ाले,तांबोळी,आतार,पठान , शहरातील सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते.

आंतरराज्य गुन्हेगाराकडून चोरीचे सात गुन्हे उघडकीस; चोरटा जेरबंद

फौजदार चावडी पोलिसांची कामगिरी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर,पुणे व धाराशिव या तीन जिल्ह्यात दुचाकी व मोबाइल चोरीचे सात गुन्हे दाखल असलेल्या आंतरराज्य चोरट्याला फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने जेरबंद केले आहे. त्याच्याकडून सात दुचाकी हस्तगत केल्या असून एकूण तीन लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून तीन दुचाकी व नवी पेठेतून एक

मोबाइल चोरीला गेला होता. एकजण हातगाडीवरील कपडे खरेदी करीत असताना त्यांची नजर चुकवून त्यांचा मोबाइल चोरट्याने पळविला होता. या प्रकरणी फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता. दिवसेंदिवस आपल्या हद्दीत दुचाकी चोरी वाढत असल्याने वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वनाथ सिद, पोलिस निरीक्षक विकास देशमुख यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाला चोरट्याच्या तपासासंदर्भात सूचना केल्या होत्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाने चोरीच्या ठिकाणी जावून पडताळणी केली. गुन्हेगाराची गुन्हे करण्याची पद्धत बारकाईने जाणून घेतली. त्याचवेळी २३ सप्टेंबरला पोलिसांना खबर मिळाली की चोरीची दुचाकी व मोबाइल विक्रीसाठी एकजण शिंदे चौकात येणार आहे. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक धायगुडे यांनी त्याठिकाणी सापळा लावून ओमप्रकाश रामनिवास कमेडिया (रा. डांगाबास, राजस्थान) याला पकडले. ही कामगिरी सहायक पोलिस निरीक्षक श्री. धायगुडे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार प्रविण चुंगे, रविंद्र परबत, अजय पाडवी, अमृतराव कदम, विनोद व्हटकर, कृष्णाथ बडुरे, नितीन मोरे, सचिनकुमार लवटे, अजय चव्हाण, विनोद पुजारी, पंकज यादगे, सुधाकर माने, तौसिफ शेख, अमोल खरटमल, शशिकांत दराडे, नागनाथ गुळवे यांच्या पथकाने पार पाडली.

साडेतीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत

संशयित आरोपी ओमप्रकाश कमेडिया याच्यावर फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चार गुन्हे,इंदापूर,नळदुर्ग,कुर्डुवाडी,धाराशिव येथे प्रत्येकी एक,असे सात गुन्हे दाखल आहेत. त्याची उकल पोलिस तपासात झाली असून त्याच्याकडून साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.